

स्थापना : १९८४

नॅक मानांकन : बी ग्रेड

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "

– शिक्षणमहर्षी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय

तासगाव, जि. सांगली












# माहेर 2020-21

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची महाविद्यालयास भेट









महाविद्यालय अधिक शिष्यवृत्तीधारक प्राचार्य यांचा सत्कार करताना डॉ. शिर्केसर



३० जून ऑनलाईन सेमिनार आयोजित : प्रा. महेश कोलतांबे

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "



शिक्षण महर्षी परमपूज्य **डॉ. बापूजी साळुंखे**

संकल्पक, संस्थापक, 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था', कोल्हापूर

जन्म : ९ जून १९१९

महानिर्वाण – ८ ऑगस्ट १९८७



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## संस्था पदाधिकारी

अध्यक्ष



मा. ना. चंद्रकांत (दादा) पाटील

कार्याध्यक्ष



मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कार्याध्यक्ष



मा. डॉ. पुंडलिक महादेव काळभोर

उपाध्यक्ष



मा. संपतराव रामचंद्र जेधे

उपाध्यक्ष



मा. नामदेव कांबळे

सेक्रेटरी



मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे

सचिव-प्रशासन



मा. प्राचार्य डॉ. युवराज भोसले

सचिव-अर्थ



मा. प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ

# संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव



प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील



प्राचार्य समवेत प्राध्यापक वृंद



प्राचार्य समवेत प्रशासकीय कर्मचारी

# गुणवंत विद्यार्थीनी


श्रद्धा धुमाळ, प्रथम


सुप्रिया मोरे, द्वितीय


स्नेहा सावंत, तृतीय


जयश्री माने, चतुर्थ


मयुरी शेंडगे, राज्यस्तरीय निबंध स्पर्धा द्वितीय


डॉ. एम. एस. उभाळे, पी.एचडी. प्रदान

## क्षण चित्रे



२६ नाव्हेंबर संविधान दिन कार्यक्रम


डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वान दिन


क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती


स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह प्रतिमापूजन


प्रात्यक्षिक पुर्तता कोल्डस्टोरेज भेट


स्वामी रामानंद भारती शाळा भेट



२१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन : श्री. धोत्रे सर स्वागत करताना



२ ऑक्टोबर म. गांधी प्रतिमापूजन



८ ऑगस्ट डॉ. बापूजी साळुंखे पुण्यतिथी निमित्त प्रतिमापूजन



राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त प्रतिमापूजन



९ जून डॉ. बापूजी साळुंखे जयंती दिन प्रतिमापूजन



म.गांधी जयंती व लालबहाद्दूर शास्त्री जयंती प्रतिमापूजन



आरोग्यविषयक जाणीवजागृती व्याख्यान देताना मोहन जगताप



वाचन प्रेरणा दिन : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्मृति दिनानिमित्त प्रतिमापूजन



राष्ट्रीय शिक्षक दिन मौलाना आझाद यांची प्रतिमापूजन



पंचायत समिती भेट : गट विस्तार अधिकारी सौ. शेंडगेंसमवेत



अध्ययन स्त्रोत : आय.सी.टी. लॅब भेट



अभिरुप अध्यापन गट १ चर्चा करताना प्रशिक्षणार्थी



अभिरुप अध्यापन गट ३, पाठ घेताना प्रशिक्षणार्थी



अभिरुप अध्यापन गट २, पाठ घेताना प्रशिक्षणार्थी



अभिरुप अध्यापन गट ४, पाठ घेताना प्रशिक्षणार्थी



अभिरुप अध्यापन गट ५, पाठ घेताना प्रशिक्षणार्थी



शालेय आंतरवासिता : शालेय भेट



शालेय आंतरवासिता परिसर स्वच्छता ऑनलाईन उपक्रम



संस्था भेट : विभाग प्रमुख व्ही. एच. पाटील व प्रशिक्षणार्थींसमवेत




सुंदर हस्ताक्षर फलक लेखन करताना श्री. कोठावळेसर




सुंदर चित्रकला श्री. कोठावळेसर




मराठी भाषा गौरव दिन मुलाखत घेताना



आंतरराष्ट्रीय ग्राहक दिन व्याख्यान देताना : प्रा. एम. डी. पाटील



हस्ताक्षर सुधार मार्गदर्शन करताना श्री. ठोके सर



शालेय आंतरवासिता डॉ. गणेश भांभलेसर यांचा सत्कार करताना



ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रम



माजी विद्यार्थी मेळवा : सहभागी विद्यार्थीनी



ऑनलाईन शालेय आंतरवासिता प्रयोग दाखविताना



शालेय आंतरवासिता आढावा बैठक : प्राचार्य व शिक्षक वर्ग



अभिरुप मतदानाची माहिती घेताना प्रशिक्षणार्थी

स्थापना : १९८४

नॅक मानांकन : बी ग्रेड

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "
– शिक्षणमहर्षी परम पूज्य डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित





# संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय

तासगाव, जि. सांगली

# माहेर २०२०-२०२१

## संपादक मंडळ

✻ प्रमुख संपादक ✻
मा. प्रभारी प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील

✻ कार्यकारी संपादक ✻
प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे

✻ सहाय्यक संपादक : प्रा. सौ. प्रभा सयाजीराव घोरपडे, डॉ. अनिल तानाजी पाटील, डॉ. मोतीलाल सुकदेव उभाळे, डॉ. अर्चना शांतीनाथ चिखलीकर

✻ मुखपृष्ठ संकल्पना : डॉ. अर्चना शांतीनाथ चिखलीकर, प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे

✻ विद्यार्थी प्रतिनिधी : कु. सायली शंकरराव पाटील बी.एड. भाग २, कु. धनश्री कुंभार, बी.एड.भाग १

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## व्यवस्थापक मंडळ


मा. नामदार पाटील चंद्रकांत (दादा) बच्चू ........अध्यक्ष

मा. जेधे संपतराव रामचंद्र ...................... उपाध्यक्ष

मा. कांबळे नामदेवराव विठ्ठलराव ................उपाध्यक्ष

मा. प्राचार्य साळुंखे अभयकुमार गोविंदराव .....कार्याध्यक्ष

मा. डॉ. काळभोर पुंडलिक नामदेव ..............कार्याध्यक्ष

मा. प्राचार्या सौ. गावडे शुभांगी मुरलीधर ............सचिव

मा. प्राचार्य डॉ. भोसले युवराज अंबादास.......... सहसचिव-प्रशासन

मा. प्राचार्य डॉ. शेजवळ राजेंद्र विश्वनाथ ..सहसचिव-अर्थ

मा. खासदार छत्रपती संभाजी शाहू ................सदस्य

मा. पाटील अविनाश दिनकर .........................सदस्य

मा. वायदंडे जगन्नाथ गदू .............................सदस्य

मा. कुंभार सदाशिव कृष्णा .............................सदस्य

मा. गवळी सिताराम महारु ............................सदस्य

मा. पाटील विष्णु सुबराव ..............................सदस्य

मा. देशमुख जयसिंगराव श्रीराम .......................सदस्य

मा. कांबळे सखाराम सत्याप्पा ........................सदस्य

मा. माळी बाळासाहेब निवृत्ती..........................सदस्य

मा. काटे शशिकांत यशवंत ...........................सदस्य

मा. प्राचार्य डॉ. चौधरी हनुमया.........................सदस्य

मा. साळुंखे श्रीराम शरदचंद्र ..........................सदस्य

मा. देसाई सूर्यकांत हरिभाऊ ........................सदस्य

मा. काशिद सूर्यकांत महादेव ........................सदस्य


## आजीव सेवक समिती


मा. डॉ. भोसले युवराज अंबादास ............. अध्यक्ष

मा. प्राचार्या सौ. गावडे शुभांगी मुरलीधर ....... सेक्रेटरी

मा. डॉ. शेजवळ राजेंद्र विश्वनाथ ............... सदस्य

मा. गवळी सिताराम महारू ...................... सदस्य

मा. सांगळे भाऊसाहेब नानासाहेब ............. सदस्य

मा. कांबळे सखाराम सत्याप्पा .................... सदस्य

मा. माळी बाळासाहेब निवृत्ती ..................... सदस्य

मा. पाटील विष्णु सुबराव ......................... सदस्य

मा. काटे शशिकांत यशवंत ....................... सदस्य




# संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे
# महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव

## ✻ प्राध्यापक वृंद ✻

| | | |
|---|---|---|
| प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील | प्राचार्य | एम. ए., एम. एड., पीएच. डी. |
| प्रा. सौ. प्रभा सयाजीराव घोरपडे | सहयोगी प्राध्यापक | एम. एस्सी., एम. एड., एम. फिल. |
| प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे | सहायक प्राध्यापक | एम. ए., एम. एड., सेट |
| प्रा. डॉ. अनिल तानाजी पाटील | सहयोगी प्राध्यापक | एम. एस्सी., एम. एड., एम.फील., सेट, पीएच.डी |
| प्रा. डॉ. अर्चना शांतीनाथ चिखलीकर | सहायक प्राध्यापक | एम.ए., एम.एस्सी., एम.एड., सेट, नेट, पीएच.डी. |
| डॉ. मोतीलाल सुकदेव उभाळे | सहायक प्राध्यापक | एम.एस्सी., एम.ए., एम. एड., एम. फिल., पीएच. डी., सेट, नेट, |
| प्रा. आनंदा गोपाळ पाटील | ग्रंथपाल | बी.ए., एम.लिब., सेट, एम.फिल., सेट, केसेट |

## ✻ प्रशासकीय कर्मचारी ✻

| | | |
|---|---|---|
| श्री सुनील शामराव महाडिक | मुख्य लिपिक | बी. कॉम. |
| श्री संजय रघुनाथ कुंभार | सिनिअर क्लार्क | बी. ए. |
| श्री शशिकांत गोरखनाथ कोठावळे | ग्रंथालय परिचर | बी. ए. |
| श्री हणमंत तुकाराम वाघमारे | शिपाई | बी. ए. |

## ✻ महाविद्यालयीन विकास समिती ✻

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे | व्यवस्थापन अध्यक्ष |
| मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | व्यवस्थापन सचिव |
| मा. प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील | महाविद्यालय प्राचार्य |
| प्रा. सौ. प्रभा सयाजीराव घोरपडे | प्राचार्य नामनिर्देशित विभागप्रमुख |
| डॉ. अनिल तानाजी पाटील | पूर्णकालिक मान्यताप्राप्त अध्यापक |
| प्रा. डॉ. मोतीलाल सुकदेव उभाळे | पूर्णकालिक मान्यताप्राप्त अध्यापक |
| प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे | पूर्णकालिक मान्यताप्राप्त अध्यापक (महिला) |
| श्री. सुनील एस. महाडिक | नियमित अध्यापकेतर कर्मचारी |
| मा. श्री. व्ही. जे. मस्के | शिक्षण क्षेत्रातून नामनिर्देशित सदस्य |
| मा. श्री. संजय नाईक | उद्योग क्षेत्रातून नामनिर्देशित सदस्य |
| मा. डॉ. बाबुराव गुरव | संशोधन क्षेत्रातून नामनिर्देशित सदस्य |
| मा. डॉ. जयश्री पैलवान (माजी विद्यार्थी) | समाजसेवा क्षेत्रातून नामनिर्देशित सदस्य |
| डॉ. अर्चना शांतिनाथ चिखलीकर | समन्वयक, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी समिती |
| कु. सायली शंकरराव पाटील | विद्यार्थी परिषद सचिव |
| कु. अश्विनी किणीकर | विद्यार्थी परिषद सचिव |

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## संस्थेची प्रार्थना

हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे
हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे
राम कृष्ण, रहीम ख्रिस्त
बुद्ध झरतुष्ट।
महावीर मानवसंत मानव्याचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदूया चरण।
सत्य, शील, प्रामाणिकता
त्याग, पिळवणुकीस आळा।
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्त्व दर्शन।
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणात।

**– शिक्षणमहर्षी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे**

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नमः उक्ति विधेम्।।

**– ईशावास्योपनिषद**

## ✻ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये –

- ✻ शहराच्या मध्यभागी प्रशस्त इमारत
- ✻ सुसज्ज ग्रंथालय
- ✻ अर्हताप्राप्त प्राध्यापक वर्ग
- ✻ निकालाची उज्ज्वल परंपरा
- ✻ सुसज्ज आय.टी. लॅब व शैक्षणिक तंत्रविज्ञान कक्ष
- ✻ शैक्षणिक मानसशास्त्रीय प्रयोगशाळा
- ✻ विज्ञान प्रयोगशाळा
- ✻ क्रीडांगण व क्रीडा साहित्याची उपलब्धता
- ✻ सुसज्ज व पुरेशा तेरा सरावपाठ शाळा
- ✻ टी. ई. टी. मार्गदर्शन वर्ग.
- ✻ ऑनलाईन टेस्ट

# मनोगत....



ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हे व्रत विधान घेऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञान गंगा घरोघरी पोहचविण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना सन १९५४ साली केली. सध्या संस्थेची एकूण सांस्कृतिक केंद्रे ४०६ आहेत. संस्थेत अध्यापक विद्यालये व महाविद्यालये एकूण ११ आहेत. यामधील संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव येथे १९८४ पासून कार्यरत आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखेसाहेब व संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांच्या वेळोवेळी मार्गदर्शनामुळे महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज व्यवस्थित चालू आहे. निमशहरी भागात सदर महाविद्यालयाचे शैक्षणिक कार्य उत्कृष्टपणे चालू आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे अनेक विद्यार्थीनींना शिक्षणशास्त्रातील पदवी मिळवून शिक्षिकेचे पावित्र कार्य करण्याची संधी मिळाली आणि समाजात मानसन्मान ही मिळाला. महाविद्यालयाच्या अनेक प्रशिक्षणार्थी शासकीय, प्रशासकीय सेवेत सुद्धा कार्यरत आहेत.

शिवाजी विद्यापीठात महाविद्यालयाने गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत शिक्षणशास्त्र योजनेतून निमशहरी विभागातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. महाविद्यालयाचे पहिल्या फेरीतील नॅक मूल्यांकनातील मानांकन (सी+++) असे प्राप्त झाले होते. तसेच दुसऱ्या वेळी नॅक बी ग्रेड (२.४४) असे मानांकन दर्जात प्रगती झालेली दिसून येते. नॅक तिसऱ्या फेरीसाठी जून २०२१ मध्ये नॅक मूल्यांकनासाठी रजिस्ट्रेशन केले आहे. तिसऱ्या नॅक मूल्यांकनासाठी अ मानांकन मिळविण्यासाठी महाविद्यालय प्रयत्न करीत आहे.

महाविद्यालयाचा सर्वांग सुंदर विकास होण्यासाठी सन २०१९ पासून नवीन इमारतीचे बांधकाम चालू केले आहे. सदर बांधकाम जमिनीलगतचा व पहिला मजला मिळून ६००० स्क्वे. फूट क्षेत्रफळ एवढे आहे. एनसीटीईच्या मानांकनाप्रमाणे महाविद्यालयाची नूतन इमारत २०२०-२०२१ पूर्णत्वास येत असल्याने भौतिक सुविधेच्या दृष्टीने महाविद्यालय संपन्न होत आहे.

महाविद्यालयात प्रशिक्षणार्थीनींचा गुणात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्रांचा व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी अनेक उपक्रम घेतले जातात. शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, पर्यावरण विषयक, क्रीडा महोत्सव, तसेच प्रात्यक्षिक कार्याला अनुसरून उपक्रम, प्रकल्प, विषयाची मंडळे वर्षभर नियोजन व त्याची अंमलबजावणी केली जाते.

प्रशिक्षणार्थीनींनी विविध कौशल्यात पारंगत होण्यासाठी महाविद्यालयात, अद्ययावत संगणक कक्ष, शैक्षणिक तंत्रविज्ञान कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, परीक्षा विभाग, शारीरिक शिक्षण विभाग, सेमिनार हॉल प्रशिक्षण कक्ष, आर्ट व ड्रामा विभाग, योगा अभ्यासासाठी स्वतंत्र सुविधा, अद्ययावत स्वच्छतागृह तयार करण्याचे कार्य चालू आहे. महाविद्यालयात महिलांच्या दृष्टीने सुरक्षित दैनंदिन परिपाठ व प्रार्थनेचे खुले क्रीडांगण करण्यात आले आहे. सदर ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सुद्धा उपयोगी होणार आहे.

महाविद्यलयाचे प्रात्यक्षिक कार्याची पूर्तता करण्यासाठी तासगाव शहरातील व परिसरातील माध्यमिक शाळा निवडलेल्या आहेत. प्रशिक्षणार्थीनींचे आंतरवासितेचा (इंटरसोप) अनुभव चांगला येण्यासाठी सराव पाठ शाळा सोडून ग्रामीण भागातील माध्यमिक शाळा निवडलेल्या आहेत. आंतरवासिता प्रात्यक्षिक कार्यावरच भविष्यकाळातील शिक्षिका चांगल्या शिक्षिका होण्यास मदत झाल्याचे अनुभव आलेले दिसून येतात.

महाविद्यालयाचा निकाल अपवाद वगळता प्रत्येक वर्षी १०० टक्के लागतो. प्राध्यापकांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभते. महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षात डॉ. उभाळै एम. एस. व डॉ. सौ. भंडारे एल. व्ही. यांची शिक्षण क्षेत्रातील उच्च पदवी म्हणजे पीएच. डी. त्यांना प्राप्त झाल्याने ९० टक्के स्टाफ पीएच. डी. धारक झाल्याने महाविद्यालयाचे मानांकन वाढविण्यासाठी संशोधनातील कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. याचा लाभ प्रशिक्षणार्थीनींच्या संशोधन कार्यास होण्यासा मदत होणार आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील माहेर अंक प्रकाशित करत आहोत. या अंकामध्ये प्रशिक्षणार्थीनींच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध व्यक्तिलेख, कविता, वैज्ञानिक, भौगोलिक, ऐतिहासिक लेख मागवून घेतलेत. त्यांच्यामधील चांगल्या लेखाची निवड करून प्रकाशित केले आहेत. महाविद्यालयात विविध प्रकारचे वर्षभर घेतलेले उपक्रमांचे छायाचित्रांची मांडणी केलेली आहे. यामुळे वाचकांना आनंद मिळेल. मुखपृष्ठावर कोविड-१९ मुळे झालेली मानवी जीवनाची वाताहात झालेली मानवी, सामाजिक, शैक्षणिक समस्यांवरील उपाययोजना प्रतिबिंबीत केलेल्या आहेत. अंक प्रकाशित करताना अनेक व्यावसायिकांनी सदर अंकात जाहिरात देवून आर्थिक सहकार्य केल्याने अंकाचा दर्जा व गुणवत्ता वाढवण्यास मदत झाली आहे.

माहेर अंका सुंदर होण्यासाठी मुख्य संपादक, सहाय्यक संपादक, प्रथम व द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थीनीं व महाविद्यालयाचा प्रशासकीय सेवक यांच्या सहकार्यामुळे सदर अंक प्रकाशित करत आहोत. वाचकांना तो आनंदाने स्विकारावा. अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील**

# श्रद्धांजली

सन २०२०–२०२१ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या संबंधित ज्या व्यक्ती पंचतत्त्वात विलीन झाल्या, तसेच भारतातील, महाराष्ट्रातील ज्या प्रसिद्ध व्यक्ती यामध्ये लेखक, कवी, अभिनेते, संगीतकार, चित्रपट निर्माते, नाट्य समीक्षक, प्रकाशक, समाजसेवक, शैक्षणिक विचारवंत, राजकारणी अशा विविध क्षेत्रांतील मान्यवर स्वर्गवासी झाले. जुन्या पिढीतील संस्कृती जतन करू पाहणारे पिढीतील हे आधारस्तंभ होते.

अशा आमच्यातून निघून गेलेल्या मान्यवरांना महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली...



# संपादकीय ....



माहेर वार्षिक नियतकालिक आपल्या हाती देताना आम्हाला मनोमन आनंद होत आहे. संस्थेचे ब्रीदवाक्य ज्ञान, विज्ञान आणि शिक्षणप्रसार या ध्येयधोरणानुसार शिक्षण संस्थेचे कार्य चालते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे एक रोपटे म्हणजे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव. १९८४ पासून स्थापन झालेली संस्था गुरुदेव कार्यकर्ता घडविण्याचे काम निष्ठेने करत आहे.

महाविद्यालय सातत्य टिकवते ते म्हणजे गुणवत्ता. १००% निकालाची परंपरा. प्रशिक्षणार्थीनींचा व्यक्तिमत्व विकास वेगवेगळी कौशल्य विकसित करण्याचे काम महाविद्यालय करत असत. खरे तर संस्थेचे ब्रीदवाक्य म्हणजे ज्ञान येथे येणाऱ्या प्रशिक्षणार्थी ज्ञानाने समृद्ध झाल्या पाहिजेत. या ज्ञानाचा वापर भविष्यातील शिक्षिका म्हणून जाताना व्हावा. तसेच विज्ञान आणि सुसंस्कारीत होऊन त्या बाहेर पडाव्यात हेच महाविद्यालयात रुजविले जाते. आजच्या प्रशिक्षणार्थी ह्या उद्याच्या भावी शिक्षिका होताना लेखक, कलावंत, त्यांच्यातील कवी, कौशल्याचा माहेर अंकामधून साकारताना दिसते. भविष्यातील या शिक्षिका उद्याचा लेखिका शाळाबाह्य राष्ट्राचा नागरिक घडविणाऱ्या आहेत. म्हणून त्यांच्या लेखनीतून समाजातील ज्वंलत समस्या, कोरोना महामारीमुळे कसे जगावे याविषयी लेखातून उतरल्या आहेत.

कोरोना महामारीमुळे महाविद्यालयात प्रत्यक्ष न येऊन सुद्धा ऑनलाईनच्या माध्यमातून लेखन पाठविण्याचे आव्हान केल्यावर चांगला प्रतिसाद दिला व काही साहित्य प्रत्यक्ष आणून दिले.

माहेर अंकासाठी प्रशिक्षणार्थीनी विविधांगी लेखन केले आहे. परमपूज्य डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक योगदान श्री स्वामी विवेकानंदांची शिकवण, कोरोनामुळे आजची स्थिती व अर्थव्यवस्था कशाप्रकारे बदलत गेली याचे विदारक चित्रण. आजची शिक्षणाची सद्यपरिस्थिती कशाप्रकारे चालली आहे याचे फायदे तोटे सांगितले आहेत. कोरोनामुळे कुटुंबातील नातेसंबंधाचे वर्णन व त्यातून मिळालेली शिकवण याचे वर्णन लेखनातून व्यक्त केले आहे. भारतीय शास्त्रज्ञ व समाजसुधारक यांच्या कार्याचाही आढावा घेतला आहे. तसेच कवीमनाचा अविष्कारही कवितामधून व्यक्त केला आहे. तसेच इंग्रजी व हिंदी साहित्यही सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

या सर्व उपक्रमांना आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे मॅडम यांचे सहकार्य, प्रोत्साहनपर मार्गदर्शन लाभत असते. तसेच प्रत्येक वर्षी संस्थेच्या भेटी महाविद्यालयास होतात. तेव्हा आम्हाला मार्गदर्शन होते. त्यामुळे आमची गुणवत्तेकडे जाणारी वाटचाल अधिक सुलभ होते. हा अंक तयार करताना आमचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील सरांची प्रेरणा व मार्गदर्शन सतत लाभत असते. तसेच संपादक मंडळातील सर्व सदस्यांच्या सहकार्याने हा अंक पूर्णत्वास आला आहे. अंकासाठी सर्व प्राध्यापकांचे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेही ऋण व्यक्त करते.

समर्पक मुखपृष्ठ प्रा. सौ. भंडारे एल. व्ही. व डॉ. चिखलीकर ए. एस. व सर्व प्रशिक्षणार्थींनी सुचविले. तसेच डॉ. सुभाष चंदर भंडारे, मा. लक्ष्मण सांभारे, श्री. स्वानंद सांभारे, श्री. अशोक लालासुरे विरभद्र सुपर मार्केट, व्हिजन कॉम्प्युटर यांनी जाहिराती देऊन खारीचा वाटा उचलला व माहेर अंक पूर्ण करण्यास सहाय्यभूत ठरला. या अंकाचे मुद्रण कराडचे श्री. आप्पा पाकले यांनी अंक उत्कृष्ठ छपाई करून सुंदर बनविण्याचा प्रयत्न केला. संपादिका म्हणून सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**प्रा. सौ. भंडारे एल. व्ही.**

# नियतकालिकाच्या स्वामित्वाबद्दल व अन्य तपशीलाबद्दल निवेदन

## माहेर २०२१

**तक्ता क्रमांक ४ ( नियम ८ प्रमाणे )**

| | | |
|---|---|---|
| ❍ प्रकाशकाचे नांव | – | संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली |
| ❍ प्रकाशन | – | वार्षिक |
| ❍ प्रकाशकाचे नांव | – | मा. प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील |
| ❍ राष्ट्रीयत्व | – | भारतीय |
| ❍ पत्ता | – | संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली. फोन : (०२३४६) २४०४०२ |
| ❍ प्रमुख संपादक | – | प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे |
| ❍ राष्ट्रीयत्व | – | भारतीय |
| ❍ पत्ता | – | संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली |
| ❍ मुद्रकाचे नांव | – | विठ्ठल गजानन पाकले<br>ॐकार ऑफसेट प्रिंटर्स, जयवंतराव जाधव आर्केड, पोपटभाई पेट्रोल पंपाचे मागे, पुणे-बेंगलोर रोड, कराड. मोबाईल नं. ८१८३९९९१७१ |
| ❍ मालकी | – | संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली |

मी प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे. (फक्त खाजगी वितरणासाठी) (या अंकातील मतांशी प्रकाशक, संपादक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)

**प्र. प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील**

# ◆ भाषा विभाग ◆

* विभाग प्रमुख *

प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे

प्रा. डॉ. अर्चना शांतीनाथ चिखलीकर

प्रा. डॉ. मोतीलाल सुकदेव उभाळे



लाभले आम्हास बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
आमच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रंगारंगात रंगते मराठी



# अनुक्रमणिका


| लेखाचे नांव | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|
| १) आजची युवा पिढी आणि व्यवसनाधिनता | शेळके सुवर्णा नामदेव | ११ |
| २) कोरोनामुळे भारतीय संस्कृतीची आठवण | पवार जोत्स्ना सुरेश | १२ |
| ३) लॉकडाऊन एक अनुभव | औंधे चारुशीला नागनाथ | १३ |
| ४) महाराष्ट्राची लोककला | पाटील रोहिणी वसंतराव | १५ |
| ५) व्यक्तिमत्व विकासात भाषेला महत्व | प्रा.सौ. भंडारे लक्ष्मी विष्णु | १६ |
| ६) संपल्या त्या लेखण्या, उरली फक्त कारकुनी | माळी रुपाली नामदेव | १९ |
| ७) माझी माय मराठी मायबोली | औंधे चारुशीला नागनाथ | २० |
| ८) वाचन : एक उत्तम छंद | शिंदे पूनम गुणवंत | २२ |
| 9) Life is Beautiful | Shaikh Zakiya Dastigir | 23 |
| 10) COVID-19 Vs Superstition and Rumours | Shaikh Zakiya Dastigir | 24 |
| 11) Inspirational English Quates to Help you Improve your English Language Learning | Sutar Asthma S. | 25 |
| 12) Today's Youth | Dr. Archana S. Chikhalikar | 27 |
| १३) कोरोनाने घेतली : परीक्षेची अग्निपरीक्षा | टकले अपर्णा गणेश | ३० |
| १४) कोरोनाच्या छायेतील शिक्षण व्यवस्था | शेळके सुवर्णा नामदेव | ३२ |
| १५) प्रारंभ होऊन कलीयुगाचा | जाधव ऋतुजा जयसिंग | ३४ |
| १६) पहिली टेडी बेअर | सुतार असमा शहाबुद्दिन | ३५ |
| १७) कोरोनाशी देऊ लढा : अर्थव्यवस्थेचा उभारु कणा | पाटील सायली शंकरराव | ३६ |
| १८) डॉ. बापूजी साळुंखे : एक थोर शिक्षण तज्ज्ञ | शिंदे पूनम गुणवंत | ४० |
| १९) २०२० चा प्रलय... | राडे कोमल राजाराम | ४२ |
| २०) गुरु-शिष्य : एक अदभुत नातं | मोरे तेजस्विनी | ४३ |
| २१) आजची महागाई | पाटील स्मिता वसंतराव | ४५ |
| २२) चीनची भारत विरोधी भूमिका | मोरे पूनम विनायक | ४६ |
| २३) भगवद्गीता – जीवनामृत | सूर्यवंशी सीमा दत्तात्रय | ४८ |
| २४) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य | पाटील सुप्रिया रावसाहेब | ५१ |
| २५) अहवाल विभाग | | ५४ |

# आजची युवा पिढी आणि व्यसनाधीनता

**शेळके सुवर्णा नामदेव**, बी. एड. भाग २

जीवनात अपयश आलं म्हणून निराश नसतं व्हायचं, मिळालं नाही अमृत म्हणून विष नसतं घ्यायचं...

निसर्गातील महत्त्वाचा ऋतू म्हणजे वसंत ऋतू होय. या वसंत ऋतूमध्ये निसर्गाला नवीन पालवी फुटते. त्याचप्रमाणे मानवी जीवनातील महत्त्वाचा वसंत ऋतू म्हणजे तारुण्य होय. परंतु या तारुण्यरूपी वसंत ऋतुमध्ये पालवी फुटण्याबरोबरच ती गळून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. ते आजच्या युवकांच्या व्यसनाधिनतेमुळेच. यशाची नशा आणि अपयशाची निराशा ही युवकांना व्यसनाधीनतेकडे घेऊन जाते. कारण आजचा युवक म्हटले की आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो तो दिशाहिन अवस्थेत भटकणारा नाक्यानाक्यावर सिगारेट फुंकत उभा राहणारा, शाळा कॉलेजचे तास बुडवून चित्रपटगृहात गर्दी करणारा, मैदानाला रामराम ठोकून व्हिडीओसमोर बसणारा आणि अपयशाच्या नुसत्या भासानेही व्यसनांना जवळ करणारा....हा आजचा युवक.

पण याला युवक म्हणावे का? कारण तारुण्य हे केवळ वयावर अवलंबून नसते. युवक कोण? हे सांगताना प्रसिद्ध विचारवंत व थोर समाजसुधारक डॉ. बाबा आमटे म्हणतात, 'युवक तो की, आपल्या खांद्यावर नवीन क्षितीजे पेलण्याचे सामर्थ्य ज्याच्या अंगी असते. वैफल्य ज्याला घासू शकत नाही आणि ज्याच्या डोळ्यातून पतंगाने झेप घ्यावी त्याप्रमाणे युवक हा आव्हानांचे क्षण टिपणारा असावा लागतो.

मागच्या पिढीतील युवकांशी तुलना करता आजच्या पिढीतील युवकांना अनेक सुखसोयी उपलब्ध झाल्या आहेत. पण या सुखसोयीचा आजची पिढी योग्य वापर करतेय का? ही फार मोठी चिंतेची बाब आहे. त्याचमुळे व्यसनाधीनतेसारख्या समस्याही बऱ्याचशा प्रमाणात वाढलेल्या आहेत. आणि अशा प्रकारच्या अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी खऱ्या अर्थाने गरज आहे ती साहसाची, व्यसनमुक्तीची आणि आत्मविश्वासाची.

स्वामी विवेकानंदानी सुमारे सव्वाशे वर्षापूर्वी म्हटले होते, 'मला फक्त १०० तरुण द्या. मी साऱ्या देशाचे चित्र बदलून टाकीन'. केवढा जबरदस्त आत्मविश्वास होता त्यांच्या अंगी. पण त्यांना व्यसनाधीन झालेले जर्जर युवक अपेक्षित नव्हते. कारण आजचा युवक हा मी एवढे तास अभ्यास केला आहे आणि मला एवढे मार्क्स नक्कीच मिळतील हे सुद्धा ठामपणे सांगू शकत नाही. याचाच अर्थ त्यांचा स्वतःवर विश्वासच नाही. आणि हा आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होण्याचे मुख्य कारण तंबाखू, मावा, अफू, गांजा, भांग, गुटका, कोकेन, चरस, गर्द यासारखी जीवघेणी व्यसने होय. रम आणि रमी यांच्या दलदलीत फसलेल्या आजच्या युवकांची सुटका व्यसनमुक्तीशिवाय होणार नाही. परंतु आजचा व्यसनाधीन युवक हा पूर्णपणे गुटक्यासारख्या जालीम विषाच्या आहारी गेलेला आपल्याला दिसतो.

आपल्या सुजलाम्-सुफलाम् भारतीय संस्कृतीमध्ये अगदी पुराणकाळापासून ते इतिहासकाळापर्यंत व सध्याच्या कलियुगापर्यंत पूर्वापार चालत असलेली मद्य ही एक विषारी नागीण आहे. ती एखाद्याला डसली की, त्याच्या जीवनाचा सर्वनाश करून, कलह लावून त्यांच्याच प्रेतावर उन्मत्त होऊन आपल्याच तालात डोलत राहते. व्यसनमुक्तीची प्रेरणा खरंतर शासनकर्त्यांपासून आचरणात आली पाहिजे. परंतु जेवायला एका पक्षात हात धुवायला दुसऱ्या पक्षात आणि हात पुसायला तिसऱ्या पक्षात. अशा सारख्या रद्दबदल्या करून दररोज जंगी पार्ट्यांच्या नावाखाली वेगवेगळ्या मद्यांची लयलूट करणारे हे शासनकर्ते युवकांना व्यसनमुक्तीची प्रेरणा काय देणार?

युवक म्हणजे इंग्रजीमध्ये YOUTH असा आहे. युथ या शब्दातील प्रत्येक अक्षरात फार मोठा मथितार्थ भरलेला आहे.

**Y** : Young म्हणजे तरुण **O** : Obidiant म्हणजे आज्ञाधारकपणा
**U** : Unity म्हणजे एकता **T** : Truthful म्हणजे सत्याला जगणारा
**H** : Healthy म्हणजे तंदुरुस्त

"Sound mind in a sound body" या उक्तीनुसार आरोग्यसंपन्न मन वास करीत असते. स्त्रीचे सौंदर्य हे तिचं सामर्थ्य असतं तर पुरुषांचं सामर्थ्य हे त्यांच्या सौंदर्यात असतं. जो युवक व्यसनाधिन न होता, व्यसनमुक्ती घडवून आणण्यासाठी "First body, second study and third lady" या विचारांनी वागण्याचा प्रयत्न करतो तोच युवक येणाऱ्या सर्व आव्हानांना, संकटांना व समस्यांना धैर्याने तोंड देऊ शकेल.

केवळ व्यसनाधीन होऊन कोणताही प्रश्न सुटू शकत नाहीत. तर बुद्धीच्या कॅमेऱ्यात विचारांचा रोल भरुन प्रयत्नांचं बटण दाबलं असता यशाचा सुंदर फोटो निघतो. हे सुंदर तत्त्व लक्षात घेऊन आजच्या युवकाने आपल्या अंगी विशाल मन उदार दृष्टिकोन, विचारशील वृत्ती आणि विधायकतेकडे नेणारी कृती या गुणांची जोपासना केली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने व्यसनमुक्ती होईल. मग आपण मोठ्या अभिमानाने म्हणू शकू.

सारे जहाँ से अच्छा, हिंदोस्ता हमारा,
हम बुलबुले है इसकी, ये गुलिस्ताँ हमारा

# कोरोनामुळे भारतीय संस्कृतीची आठवण...!

**पवार जोत्स्ना सुरेश,** बी. एड. भाग २

मागील दोन ते तीन महिन्यापासून आपणा सर्वांना कोरोना विषाणूमुळे होणाऱ्या कोविड-१९ या आजाराने भयभीत करून सोडले आहे. मला खात्री आहे की लवकरच या कोरोना विषाणूवर मात करण्यासाठी प्रतिबंधक लसीची आणि त्यावरील उपचारासाठी लागणाऱ्या औषधांचा शोध होऊन त्याची निर्मिती सुरू होईल आणि सर्व काही सुरळीत होईल.

जसं प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे माझ्या दृष्टीने या कोरोना विषाणूने त्याचे दोन्ही बाजू आपणास दाखविल्या आहेत. एका बाजूने तो जरी आपणास शाप ठरत असताना, त्याची दुसरी बाजूही पाहणे अत्यंत गरजेचे आहे. मी त्या दोन्ही बाजूंचा विचार करूनच हा लेख लिहिला आहे. मागील तीन महिन्यापासून मी जेव्हा या भयानक कोरोना विषाणूवर विचार करीत आहे तेव्हा मला अनेक गोष्टींचा उलगडा होत आहे. त्यापैकी मी काही गोष्टी मांडत आहे. या कोरोना विषाणूने मात्र जगातील सर्व मनुष्यजातीला प्रचंड शिक्षा आणि शिकवण व बऱ्याच गोष्टींची आठवण करून दिली आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

या कोरोना विषाणूमुळे आपली भारतीय संस्कृती किती थोर आणि महान आहे याची प्रचिती येत आहे. आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे हा कोरोना विषाणू आपणास बाहेरुन घरात आल्यानंतर हात आणि पाय स्वच्छ धुवायला भाग पाडत आहे. वापरलेले कपडे व्यवस्थित खुंटीवर ठेवण्यास भाग पाडत आहे. जेव्हा दोन व्यक्ती भेटतात तेव्हा त्यांना दोन्ही हात जोडून नमन करण्यासाठी भाग पाडत आहे. दोन व्यक्तींमध्ये संभाषण चालू असताना त्यांच्यात एक मीटरचे सुरक्षित अंतर ठेवण्यास भाग पाडत आहे. स्वतःचे घरातील आणि परिसर स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आहे. आपल्या भारतातील काही समाजातील लोक तोंडावर मास्क लावून बोलत असतात. या मास्कचे महत्त्व यानिमित्ताने पुढे येत आहे.

कोरोना विषाणू जनतेला स्वतःहून जनता कर्फ्यू पाळून घरात बसण्यास भाग पाडत आहे. घरातील व्यक्तीशी सुसंवाद करण्यासाठी भाग पाडत आहे. कुटुंबातील सर्व व्यक्ती एकत्र बसून जेवत आहेत. एकत्र बसून स्वतःच्या कुटुंबातील भूतकाळातील अनेक महत्त्वाचे प्रसंग, सुखदुःखाच्या, मंगलदायी, गमतीजमती यांची उजळणी करावयास भाग पाडत आहे. ज्यांचे आरोग्य कमकुवत आहे त्यांना त्यांची प्रतिकारशक्ती वाढविण्यास भाग पाडत आहे. बऱ्याच व्यक्तींना घरातील खरी परिस्थिती जाणवून देत आहे. गंमतीनं का होईना सर्व पुरुष मंडळींना घरात स्त्रियांना मदत करण्यास भाग पाडत आहे. या वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास प्रामुख्याने एका गोष्टींची मात्र आठवण होते. ती म्हणजे आपण विसरत जात असलेली आपली भारतीय महान संस्कृती आणि तिचे महत्त्व.

या विषाणूने जगातील सर्व मानवजातीला निसर्गाचे महत्त्व पटवून दिले तर आहेच. त्याचप्रमाणे निसर्गातील प्रत्येक घटकाबद्दल आदर आणि प्रेम याची भावनासुद्धा निर्माण केली आहे. जो निसर्गाच्या नियमाच्या विरुद्ध जातो त्यासाठी निसर्ग त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात नुकसान करतो. हे मात्र सर्वांनाच पटले आहे.

दरवर्षी मार्च महिन्याच्या शेवटी प्रत्येक व्यक्तीला पैशाच्या हिशोबाचा ताळमेळ ठेवणे हे अनिवार्य असते आणि तो ठेवतो. त्याच पद्धतीनं हा २०२० मात्र आपल्याला निरोगी राहण्यासाठी उत्तम आचरण, स्वच्छता, सवयी, शिस्त आणि व्यवहार या गोष्टींचा हिशोबाचा ताळमेळ ठेवण्यास कोरोनाने भाग पाडले आहे.

या विषाणूंवर जेव्हा आपण मात करू त्यानंतरसुद्धा अजून कुठल्या नवीन विषाणूच्या हल्ल्याची वाट पाहण्यापेक्षा आपण सर्वांनी घरात मागील दिवसांत ज्या पद्धतीचे आचरण, सवयी, शिस्त आणि व्यवहार घरात आहेत तो कायमचा ठेवला तर भविष्यकाळात आपण कुठल्याही विषाणूंवर किंवा आजारावर नक्की विजय मिळवू एवढी मला खात्री आहे.

चला तर या कोरोना विषाणूच्या निमित्तानं का होईना आपणा सर्वांना आपल्या भारतीय संस्कृतीची आठवण झाली असेलच. भारतीय संस्कृतीतील अनेक गोष्टींचे आपण जर व्यवस्थित आचरण केले तर भविष्यकाळात येणाऱ्या अशा अनेक विषाणूंवर आपण मात करू. आपल्या भारतातील अनेक संतांनी अनेक वर्षापूर्वी लिहून ठेवलेल्या त्यांच्या ओव्यांमध्ये भविष्यकाळात विषाणूंच्या हल्ल्याबाबत उल्लेख केला होता आणि याची प्रचिती आपणा सर्वांना येत आहे. आपली भारतीय संस्कृती इतकी सुंदर आणि थोर आहे की त्याचे महत्त्व सर्व पाश्चात्त्य देशांना पटले असून, ते त्याचे आचरण करीत आहेत आणि नेमके उलटे भारतातील अनेक लोक हे पाश्चात्त्य संस्कृतीकडे झुकलेले दिसतात.

आपण सर्वजण आपल्या भारतीय संस्कृतीचे पालन करून घरातील बालगोपाळांनासुद्धा त्यांचे महत्त्व पटवून द्या. वरील सर्व मुद्यांचा विचार करून आपण ठरवायचे आहे. कोरोना विषाणू हा आपल्या समाजाला शाप आहे की वरदान?

# लॉकडाऊन एक अनुभव...

**औंधे चारुशीला नागनाथ,** बी. एड. भाग १

आज पाहतो आपण बाहेर
मनुष्य दिसेना घराबाहेर ।
पाहुनिया ही स्थिती
मन आले दाटून, डोळे आले भरून ।।
तेच मन म्हणे हसून
अरे थांब, नको होऊ अशांत ।
विना कामा, नको जाऊस बाहेर ।।
पाळुनि सारे नियम
होईल सर्व छान ।।




२१ दिवसांसाठी लागू झालेल्या लॉकडाऊनने १०० दिवस पूर्ण केले. साखळी तुटलेली काही दिसत नाही. कारण रुग्ण अद्याप वाढतायत. कुणी जनतेला दोष देतंय, कुणी सार्वजनिक आरोग्य यंत्रणेतील त्रुटींवर बोट ठेवतंय. अर्थव्यवस्था डबघाईला येतेय असे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. व्यापार, उद्योग, व्यवसाय आणि नोकरीत चढउतार सुरू आहेत. हे सगळे नकारात्मक चित्र वास्तव असले तरी या तीन महिन्यांनी काही चांगले अनुभवदेखील दिले की, त्या विषयी चर्चा करूया ना...

समाजमाध्यमांवर एक संदेश अधूनमधून फिरत असतो. तुम्ही १९६०, १९७० च्या दशकात जन्म घेतला असेल तर तुम्हाला देशी खेळ, व्हिडीओ, वाचनालयातील पुस्तके असे अनुभव स्मरणात असतील आणि या गोष्टी नामशेष होतानाही तुम्ही पाहिल्या. तुम्ही खरे भाग्यशाली आहात, असा त्या संदेशाचा एकंदरीत अर्थ आहे. तसाच अनुभव सगळ्याच वयोगटातील मंडळींनी या काळात घेतला.

परदेश, परराज्य व महानगरांमध्ये स्थायिक झालेली मंडळी गावाकडे परतली. काही काळासाठी का होईना, या परतलेल्या भावंडांमुळे कुटुंब पुन्हा एकसंघ झाले. नातेबंध अधिक दृढ झाले. पुढच्या पिढीत कौटुंबिक जिव्हाळा वाढला. आपले क्षितिज कितीही विस्तारले तरी घरट्यात परत यावेच लागते. हे नवे भान या काळाने दिले. परदेश, परराज्य व महानगरात राहत असल्याने दोन शिंगे अधिक असल्याचा अहंकार या काळात गळून पडला. गावाकडे राहणारा नातलगदेखील सुशिक्षित सुसंपन्न व समृद्ध आहे. नातेवाईकांशी ऋणानुबंध आहेत, अडीअडचणीत धावून जाणारी भावकी आहे याची प्रचिती दिली. गावाशी नाळ कायम ठेवायला हवी ही जाणीव झाली. सणवार, लग्न समारंभ, यात्रोत्सव काळात जसे जमेल तसे यायचे असा निर्धार केला गेला. ऐन उन्हाळ्यात लॉकडाऊनचा काळ आल्याने सुट्टीत बाहेरगावी जाणारे, चित्रपट-हॉटेलची नियमित सवय असलेले लोक सक्तीने घरी राहिले. त्याचे लाभ तरी किती झाले. गृहिणींचे कष्ट पुरुषमंडळींना कधी नव्हे ते दिसले. पुरुषांमधील पाककलेचा गुण घरच्यांना कळाला. हॉटेलमध्येच खाल्लेल्या नवनव्या डिशेश यु ट्युब च्या माध्यमातून तरी बनू लागल्या. उन्हाळी कामे यंदा वेळेत झाली. सगळ्यांचा हातभार लागल्याने महिलावर्गावर भार पडला नाही. उडीदाचे पापड, तांदळाचे पापड, शाबूचे पापड, बटाटे चिप्स इ. उन्हाळ्यात चालणाऱ्या कामांना सगळ्यांचा हातभार लागला. घरातील कामांना सगळ्यांचा हातभार लागला. घरातील कपाटे, माळे आवरले गेले. अंथरूणे, पांघरुणे, धुवून झाली. केवढी कामांची यादी असते. हे प्रथमच घरातील सगळ्यांना कळले. कॅरम, ल्युडो, चौपट, व्यापार, सापशिडी असे बैठे खेळ रोज खेळले गेले. टी. व्ही.पेक्षा या खेळांचा आनंद वेगळा असतो. याची अनुभूती लहान मुलांना आली. पुस्तके वाचण्याचा आनंद पुन्हा एकदा भूतकाळात घेऊन गेला. धावपळीच्या जीवनात या आनंदापासून आपण मुकलो होतो. हे जाणवले.

ऑनलाईन शिक्षण वर्क फ्रॉम होमच्या निमित्ताने नवे ॲन्ड्रॉइड मोबाईल, लॅपटॉप घरात आले. यु ट्युबवरील पाककला, टी. व्ही. वरील मालिकांचे सुटून गेलेले भाग बघण्याचा आनंद महिला वर्ग घेऊ लागला. तात्पुरता रोजगार गमावलेल्या भंगार विक्रेता, रिक्षा चालक बांधवांनी हार न मानता रिक्षाचा वापर भाजीपाला, फळे विक्रीसाठी केला. लॉकडाऊनमुळे लोकांना घराबाहेर पडण्यास बंदी असल्याने घरपोच भाजीपाला, किराणाचे साहित्य मिळत असल्याने प्रतिसाद चांगला मिळाला. शेतकरी बांधवांनी देखील बांधावरून थेट ग्राहकांच्या घरापर्यंत माल पोहोचविला. दलालाची साखळी तुटल्याने शेतकऱ्याला दोन पैसे मिळाले आणि ग्राहकाला ताजा भाजीपाला मिळाला.

लॉकडाऊनमुळे कुठेही जाता येत नव्हते. परंतु

नातेवाईक विचारपूस अगदी आठवणीने करू लागले होते. त्यामुळे आपापसातील जिव्हाळाही वाढला. काही कुटुंबीयांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत ट्रीप काढल्या होत्या म्हणजे ठरविलेल्या होत्या. त्यांना ट्रीप्स कॅन्सल कराव्या लागल्या. परंतु घरी राहूनसुद्धा कुटुंबियांसमवेत अत्यंत आनंदाने, हसतखेळत वेळ घालवला. शाळा, कॉलेज बंद असल्याने मुले घरी बसून अभ्यास करू लागली. ऑनलाईन क्लास सुरू झाले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन परीक्षाही झाल्या. त्यामुळे एक अविस्मरणीय अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. तसेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. परंतु समोर उभारुन शिक्षक आपल्याला शिकवतात, आपल्याला प्रश्न विचारतात तसेच विद्यार्थ्यांचे लक्ष आहे की नाही ते पाहतात, त्यात काही वेगळाच आनंद असतो. कारण त्यामुळे आपल्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन शिक्षक करतात.

अशा रीतीने घरात राहणे फार काही कंटाळवाणे नसते हे सक्तीच्या लॉकडाऊनने शिकवले. अशा प्रकारे लॉकडाऊन हा अनुभव आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

# शोध माझा चालु आहे

जन्म माझा कशासाठी? मृत्यू मला पुसत आहे.
सावधान म्हणजे मृत्यूला... शोध माझा चालू आहे...
कधी इकडे आड तर कधी तिकडे विहीर आहे.
उघड्या बोबड्या डोळ्यांपुढे कसला तरी तिमिर आहे
स्वतःच्याच हिंमती मनगटावर क्रोध माझा चालू आहे
विश्वास उठलाय सगळा.... शोध माझा चालू आहे...
वाट एक निवडताना चुका सारख्या होत आहेत
आशेचा सूर्य उगवण्यापूर्वीच दिशा पारख्या होत आहेत.
दिशाहीन आयुष्याची वेडी सजा चालू आहे
संपेल ही सजा कधीतरी... शोध माझा चालू आहे.
योग्य वाट निवडताना उशीर जरा झाला आहे
वेळेबरोबर मोफत म्हणून पैसा सारा गेला आहे
बंद पडलेल्या डोक्यांमध्ये प्रश्नांचा बाजा चालू आहे
बाजा चाललाय फुटून तरी शोध माझा चालू आहे.
रक्तामधली धमक माझी विसरून मी गेलो आहे
डोळ्यांमधली चमक माझी हरवून मी गेलो आहे
पण ध्येयसाधनेच्या आशेने मेलेलं मन बोलू पाहे,
पल्ला अजून बाकी आहे... शोध माझा चालू आहे...

**– सुप्रिया धोंडीराम पाटील**
बी. एड. २




# गौरी गीत

माझा रहाट गं...
माझा रहाट गं साजणी
गाती चौघीजणी
माझ्या रहाटावरची जाई
माझी एकलीच आई
माझ्या घरी का गं येईना
माझी भेट का होईना
माझा रहाट गं साजणी.
माझ्या रहाटावरचा चाफा
माझा एकलाच बाप
माझ्या घरी का ग येईना
माझी भेट का होईना
माझा रहाट गं साजणी
गातो चौघीजणी
माझ्या रहाटावरचा झेंडू
माझा एकलाच बंधू
माझ्या घरी का ग येईना
माझी भेट का होईना
माझा रहाट गं साजणी
गातो चौघीजणी

**– कु. स्मीता वसंतराव पाटील**
बी. एड. २



# महाराष्ट्राची लोककला

**पाटील रोहिणी वसंतराव,** बी. एड. भाग २

महाराष्ट्रातील प्रामुख्याने तीनच मुख्य गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्या म्हणजे ऊसाचा फड, कुस्तीचा फड आणि सर्वात शेवटी तमाशाचा फड. ऊसाचा फड जिथे काळ्या आईची सेवा करणारा शेतकरी रात्रंदिवस राबत असतो. कुस्तीचा फड जिथे भरपूर व्यायाम करून मजबूत शरीर कमावलेले पैलवान एकमेकांशी चुरशीची लढत लढत असतात. तमाशाचा फड जिथे जपलेली अवघी लोककला ती म्हणजे लावणी.

लावणी म्हटलं की समोर चित्र उभं राहतं ते रंगीबेरंगी कपड्यांनी उभारलेले फड, दिलखेचक अदाकारी करणारी नटरंगी नार आणि त्यांच्या साथीला असणारे स्त्रियांसारखे हावभाव करणारे सोंगाडे. लावणी हा लोकनृत्याचा प्रकार फार पूर्वीपासून चालत असलेला. पूर्वी म्हणजेच काही दशकांआधी प्रसारमाध्यमे विकसित नव्हती तेव्हा लोक गावोगावी जत्रांचे आयोजन करत. प्रत्येक जत्रेमध्ये एखादा तरी लावणीचा कार्यक्रम ठरलेलाच असे. जत्रेमध्ये लावणीचा कार्यक्रम पाहण्यासाठी लोकांची तुडुंब गर्दी असायची.

लावणी मुख्यतः ढोलकी व तुणतुणे या वाद्याच्या साथीने सादर केली जाते. महाराष्ट्रातील लावणी सादर करणाऱ्या स्त्रिया मुख्यतः नऊवारी साडी परिधान करत लावणी महाराष्ट्रात मुख्यतः तेराव्या शतकात अस्तित्वात आली. परंतु तिला वैभव प्राप्त करून दिले ते म्हणजे पेशवाईने. मराठी लोकनाट्याच्या विकासासाठी लावणीचे खूप मोठे योगदान आहे. लावणी हा कला प्रकार शृंगार व भक्ती या रत्नांचा परिपोष करण्याचे माध्यम समजले जाते.

लावणी या शब्दातील लावन्य म्हणजे सौंदर्य, लावणी म्हणजे गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा त्रिवेणी संगम. लावणीचे मूळ हे गौळणी आणि अभंग यात दिसून येते. अवघ्या दोन शतकांपासून शाहिरांची उत्पत्ती झाली. ज्यात राम जोशी आणि अनंत फंदी यासारख्या शाहिरांचा प्रामुख्याने समावेश होतो. विसाव्या शतकात पठ्ठे बापूराव यासारख्या कलावंत नावारूपाला आला. ज्याने फक्त लावणीच नव्हे गण, गवळणीही रचल्या. प्रसारमाध्यमांनी सध्या पठ्ठे बापू या नावाने अनेक लावण्या सादर केल्या आहेत. महाराष्ट्रात हा केवळ लावणीपुरताच नसून गवळण, पोवाडे, सवाल जबाब यासारखेही मनोरंजनात्मक साहित्यातही त्याचे योगदान आहे.

सवाल जबाब हा प्रकार लावणीमध्येही मोडतो. विसाव्या शतकातील चित्रपटातील लावण्या ह्या सवालजबाब या प्रकारातील असत. यामध्ये लावणी सादर करणारे दोन गट हे एकमेकांना संभ्रमात टाकतील असे सवाल विचारत. या गायनाची सुरुवातही "सवाल माझा ऐका....." या वाक्याने होई. यामध्ये प्रेक्षक वर्गालाही माहीत नसलेल्या बऱ्याच गोष्टींची उकल होई.

लावणीचे मुख्यतः तीन प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे –

* नृत्यप्रधान लावणी
* बैठकीची लावणी
* अदाकारीप्रधान लावणी

नृत्य, अदाकारी आणि गायन यांचा त्रिवेणी संगम घडवणाऱ्या लावण्या विठाबाई नारायणगावकर, सुरेखा पुणेकर सादर करीत असत. विठाबाई नारायणगावकर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. घुंगराच्या बोलांचा तसेच घोड्यांच्या टापांचा आवाज काढण्याचेही कसब लावणी सम्राज्ञीकडे होते.

सध्या प्रसारमाध्यमांनी वेगवेगळ्या स्पर्धांच्या माध्यमातून ही कला जीवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. टेलिव्हिजनवर अप्सरा आली, ढोककीच्या तालावर या वास्तववादी कार्यक्रमातून ही कला जतन करण्याचा प्रयत्न करत आहेत.



# व्यक्तिमत्त्व विकासात भाषेला महत्त्व

**प्रा. सौ. भंडारे लक्ष्मी विष्णु**, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे म. शि. शा. महा. तासगाव

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेच्या युगात कौशल्यपूर्ण ज्ञान महत्त्वाचे आहे तसेच व्यक्तिमत्त्वालाही महत्त्व आहे. आपण इतरांच्या पेक्षा वेगळे उठून दिसण्यासाठी आपल्या व्यक्तिमत्त्व उठून दिसते. व्यक्तिमत्त्वामुळे व्यक्तिमत्त्वही एका साध्या सोप्या भाषेत सांगायचे झाले तर एखादी व्यक्ती पाहिल्यावर त्या व्यक्तीचा ठसा आपल्यावर उमटतो ते त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व असते. ठसा कशामुळे उमटतो याचा विचार केला तर असे लक्षात येते की सामान्यपणे ती व्यक्ती दिसते कशी त्याचे रंगरूप बांधा केस बोलण्याची पद्धत कपडे यामुळे प्रथमदर्शनी आपण तिच्याबद्दल काही मत व्यक्त करतो पण केवळ बाह्य दर्शन किंवा व्यक्तीचे बहिरंग पण रंगाचा पुरेसा विचार नसतो तर अंतरंग हे महत्त्वाचे असते. तिचे विचार महत्त्वाचे असतात म्हणून व्यक्तिमत्त्वात अंतरंग किंवा बहिरंग व्यक्तिमत्त्व या शब्दाला इंग्रजीमध्ये पर्सनॅलिटी असा शब्द वापरतो परसोना या लॅटिन शब्दापासून पर्सनॅलिटी हा शब्द बनला आहे. परसोना म्हणजे लॅटिनमध्ये मुखवटा होईल पूर्वी रोममध्ये नाटकातील पात्रे आपली भूमिका वटवताना त्यात या पात्राचा मुखवटा घालत असत यावरून हा शब्द आला आहे व्यक्तिमत्त्वामध्ये अनेक बाह्य आणि अंतर्गत घटक सामावलेले आहेत व्यक्तीचे जीवन सतत बदलत असते त्यात सतत अनुभवांची भर पडत असते. व्यक्तिमत्त्व बदलतच असते व्यक्तिमत्त्व म्हणजे शरीररचना वर्तन विशेष अभिरुची कृती क्षमता या सर्वांची एकात्म वैशिष्ट्यपूर्ण गुंफण होय. साध्या शब्दात सांगायचे झाले तर एखादी व्यक्ती दिसते कशी, कशी आहे, ती निरोगी आहे किंवा कसे, हा कसा आहे याचा समावेश व्यक्तिमत्त्वात होतोच शिवाय ती इतरांशी बोलते, वागते कशी, तिची मानसिक अवस्था कशी आहे, एखाद्या घटनेला कसा प्रतिसाद देते, तिच्यात कोण कोणते गुण आणि दोष आहेत याचाही समावेश व्यक्तिमत्त्वात असतो दिसणे आणि असणे यांचा संबंध तिच्या व्यक्तिमत्त्वाची आहे ती कशी दिसते तिचे व्यक्तिमत्व तिचा स्वभाव कसा आहे म्हणजे तिचे व्यक्तिमत्त्व नव्हे तर अंतरंग आणि बहिरंग या दोन्ही मिश्रणाचे मिळून व्यक्तिमत्त्व होते. आजच्या स्पर्धेच्या युगात कौशल्यपूर्ण ज्ञान आणि व्यक्तिमत्व हे टिकून राहण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. चार चौघांच्यामध्ये आपण वेगळे उठून दिसणार असतो ते केवळ आपल्या व्यक्तिमत्त्वामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण. जडणघडण आणि आपण घेतलेल्या अनुभवांचा प्रभाव आपल्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. आपले व्यक्तिमत्त्व उत्तम असावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. उत्तम व्यक्तिमत्त्वासाठी शारीरिक क्षमता, सकारात्मक दृष्टिकोन पोषाख, केशरचना, अलंकार, मनमोकळेपणा, शिष्टाचार, शिक्षण, बौद्धिक सामर्थ्य, कुटुंब, चांगल्या सवयी असे कितीतरी घटक कारणीभूत असतात त्यापैकीच एक महत्त्वाचा घटक म्हणजे आपली भाषा. भाषा हे समाज व्यवहाराचे जरी साधन असले तरी ते आपल्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे अंग आहे. आपल्या भावना किंवा विचार, कल्पना प्रकट करण्यासाठी आपण आपल्या भाषेत बोलत असतो जन्मता येत नसते ती कुटुंबियांकडून शिकावी लागते आपण ज्या समाजात वावरतो या समाजाची विशिष्ट बोली भाषा बोलताना व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वावर बरा वाईट परिणाम करत असतात. जेथे आपण नोकरी करतो तेथे शिक्षणाबरोबर नोकरी व्यवसायासाठी आपल्याला भाषा यायला हवी आज लहानसे झाले असले तरी आज केवळ आपल्या भाषेत समाजाची भाषा बोलता येणे पुरेसे नाही तर इतर भाषेचे ज्ञान आपल्याला असायला हवे. जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी भाषा येणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर इतर भाषांचे ज्ञान समजणे हे अधिक गुणवत्तेचे लक्षण मानले जाते. ज्यांना अनेक भाषा येतात त्यांचे करियर उत्तम असते. हे नोकरी व्यवसायासाठी अधिक महत्त्वाचे असते पण आपण रोजच्या रोज व्यापारात भाषेचा वापर करताना पूर्ण विचारांती करायला हवा. उचलली जीभ लावली टाळ्याला असे बोलणे नसावे. शब्द समर्पक असावेत. उच्चार स्पष्ट असावेत. त्यामुळे आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे ते समोरच्या व्यक्तीला कळते. आपल्या उत्तम व्यक्तिमत्त्वासाठी सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. आपण बोलताना मुखाने भाषेच्या साहाय्याने बोलत असतो पण त्याचवेळी आपण हावभाव करत असतो. डोळ्यांची हालचाल, हातांची हालचाल, मानेची हालचाल यातून आपले म्हणणे व्यक्त होत असते. बोलताना आपण ज्या भावना व्यक्त करत असतो त्याच भावना आपल्या हावभावातून व्यक्त होत असतात. आपल्या आपल्या बोलण्यात येत असतात. म्हणून आपल्याला त्यांच्या थोडा आपल्याला त्यांच्या हावभावावरून थोडाफार अंदाज येत असतो आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वासाठी आपल्या देहबोलीतून आपला आनंदी स्वभाव कामाबद्दलची कळकळ व्यक्त होत असते. यासाठी दुसऱ्या प्रतीची आत्मीयता आपला चेहरा प्रसन्न असायला हवा.विचारपूर्वक शब्द वापरायला हवेत. बोलताना कोठेही आपण बोलत बसलेलो असताना आपले

हावभाव कळत नसावे. म्हणजेच काम कारणे डोके खाजवणे, तोडात कुरतडणे, सतत केसावरून हात फिरवतो, खिशात हात घालून काढणे, खुर्चीवर बसणे, सतत पाय हलवणे अशा अनावश्यक हालचाली ह्या असंस्कृतपणाचे लक्षण आहे. त्यामुळे आपल्याविषयी प्रतिकूल मत तयार होते. चांगल्या सवयी मुद्दामहून लावून घ्यायला हव्यात. तरच आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी होईल. यात शंका नाही. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक घटक स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी आपल्याला कौशल्यपूर्ण ज्ञान असायला हवे आपण उठून दिसणार असतो ते केवळ आपल्या व्यक्तिमत्त्वामुळेच यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

१. निरोगी शरीरात निरोगी मन वास करत असते– यासाठी आपले शरीर निरोगी असले पाहिजे. तसेच सुदृढ असले पाहिजे सक्षम असले पाहिजे. आरोग्यपूर्ण शरीर ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. आपण कसे दिसावे हे आपल्या हातात नसते तरी ते आपल्याला आई वडिलांकडून मिळालेले असले तरीही त्यांचा विकास निश्चितच आपल्या हातात आहे. योगासने प्राणायाम ध्यानधारणा यामुळे आपले मन एकाग्र होऊन आपण तंदरुस्त राहू शकतो. निरोगी शरीरात निरोगी मन वास करत असते.

२. सकारात्मक दृष्टिकोन– जीवनात आनंदी राहण्यासाठी आणि आपले ध्येय गाठण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोनाची फार गरज आहे. कोणतेही काम चांगले करू शकतो हा आत्मविश्वास आणि संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य हे सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्वाचे उदाहरण आहे. सर्वच यशस्वी व्यक्तीकडे असा सकारात्मक दृष्टिकोन असतो. त्यांच्याकडे जबरदस्त इच्छाशक्ती असते. त्यामुळे नेहमीच्या व्यक्ती सकारात्मक दृष्टिकोनातून वावरत असतात.

३. पोशाख– आपल्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचा घटक म्हणजे आपला पोशाख. आपला पेहराव आपली ओळख करून देत असतो. आपला पेहराव प्रसंगानुरूप अनुरूप असावा स्वच्छ धुतलेले, इस्त्री केलेले कपडे व्यक्तिमत्त्व खुलवतात आपल्या पोशाखातूनच आपली शालीनता, सुसंस्कृतपणा आणि सभ्यता दिसून येते एक नूर आदमी दस नूर कपडा खरंच विधान आहे म्हणून कोणत्या वेळी कोणता पोशाख करावा हे आपण ठरवत असतो व त्यानुसार आपल्या व्यक्तिमत्त्व हे पोशाखातून उठून दिसत असते.

४. केशरचना व दागिने – जसे पोशाखाप्रमाणे आपले दागिनेही व केशरचनाही तितकेच महत्त्वाची आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वात अलंकार हा व्यक्तिमत्त्व शोभून दिसणारा महत्वाचे काम करतो. आज आपण फॅशनच्या आहारी गेलो आहोत. त्यामुळे व्यक्तिमत्त्वात कोणता पोशाख अधिका चांगला दिसतो हे ठरवतो व लगेच बदलतो. मुलाखत द्यायला जाताना ती फॅशन करण्याचे टाळावे. तसेच अलंकाराचा अतिरेक न करता मोजकेच अलंकार प्रसंगानुरुप घालावेत तरच आपले व्यक्तिमत्त्व खुलून दिसते.

५. मनमोकळेपणा – समाजात वावरताना मनमोकळे–पणाने व खुल्या संवादाने वावरले पाहिजे आपले विचार वर्तन एकच असले पाहिजे किंवा आतल्या गाठीचा स्वभाव स्वतःसाठी आणि समाजासाठी ही चांगला नसतो. आजचे आपले विचार नेहमी शुद्ध निर्मळ नितळ असावेत. तर लोक आपल्यावर विश्वास ठेवतात. स्वभावातील सच्चेपणा, खरेपणा, खुलेपणा, लवचिकता, उदाहरण हे गुण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

६. शिष्टाचार– म्हणजे सभ्य वर्तन सुसंस्कृत समाजमान्य पद यासाठी चेहरा नेहमी हसरा प्रसन्न हवा. आवाज हळू व विनम्र हवा. शालीनता, नम्रता, शिष्टाचार यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. सार्वजनिक ठिकाणी कसे वागावे याचे संकेत ठरलेले असतात. त्यांचे पालन करावे. मोठमोठ्याने हसणे, अर्वाच्च शिवीगाळ करणे, सतत खाजवत राहणे, मोबाईलवर सतत बोलणे हे शिष्टाचारात बसत नाही. या साध्या सोप्या गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करू नये.

७. मैत्री – व्यक्तिमत्त्वासाठी मित्र–मैत्रिणींची मैत्री हा एक घटक महत्त्वाचा असतो. आईवडिलांनंतर आपला संपर्क असतो तो मित्रांशी मित्र काही चांगल्या गोष्टी शिकवतात तर काही वाईट गोष्टीही शिकवतात. आपण त्यांच्याकडून कोणत्या गोष्टी घ्याव्यात आपुलकी सहकार्य भावनिक सुरक्षितता अशा चांगल्या गोष्टी मित्रांच्याकडून घ्यायला हव्यात. तसेच काही मित्र सिगारेट, बिडी, दारू, तंबाखू अशासारख्या व्यसनात बुडालेले असतात. या मुलांच्या संगतीत राहिल्यानंतर आपले वर्तनही बदलते. यासाठी आपले व्यक्तिमत्त्व उठून दिसण्यासाठी मित्र संगत चांगली करावी म्हणून म्हणतात ना सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो.

८. शिक्षण – हे व्यक्तिमत्त्व बदल घडवणारे फार मोठे एक कारण आहे. शिकलेली मुले आणि न शिकलेली मुले त्यांच्यातील एकच फरक करत आहे कारण आहे शिक्षण. शिक्षण चांगले घडवते अनेक चांगले संस्कार करत असते आपल्या विकास, भावनिक विकास होतो. क्षमता प्राप्त होतात. शिक्षणाने एक ना अनेक गोष्टी आपल्या व्यक्तिमत्त्वात येत असतात. शिक्षकांच्या सहवासात राहून मुले घडत असतात.

९. बौद्धिक सामर्थ्य व्यक्तिमत्त्व विकासात बौद्धिक सामर्थ्याला फारच महत्त्व आहे. यासाठी केवळ भरपूर गुण मिळवणे नव्हे तर संपादित ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात वापर करण्याची क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता होय. दैनंदिन जीवनात संघर्षास कशाप्रकारे सामोरे जातो, इतरांना कसे मार्गदर्शन करतो इतरांशी आपण कसे वागतो यावरून आपल्या बौद्धिक क्षमता

ठरत असतात. बुद्धी आणि अनुभव यांच्या जोरावर उच्च पदावर अनेक व्यक्ती बसलेल्या दिसतात. यासाठी त्या व्यक्तीची जबरदस्त इच्छा असली पाहिजे. सकारात्मकता पाहिजे.

१०. कुटुंब – आपल्या व्यक्तिमत्त्वाची सुरुवात जडणघडण आपल्या कुटुंबातून होत असते घरातील वातावरण संस्कार, कुटुंबाचे, कुटुंबियांचे वागणे, भाषा, आर्थिक स्तर या सगळ्यांचा मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत असतो. व्यसनी वडिलांची मुले वेगळी घडतात. उच्चशिक्षित सुसंस्कृत कुटुंबातला मुलगा वेगळा वाढतो. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. आज एक किंवा दोनच मुले असतात याचाही बरावाईट परिणाम व्यक्तिमत्त्वावर होत असतो. मुलांच्या वाढीला पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी निश्चितच पालकांची असते.

११. चांगल्या सवयी चांगल्या सवयीमुळे चारित्र्य सदाचार वाढीला लागते लोकांवर चांगल्या व्यक्तींचा प्रभाव पडत असतो. सौजन्यशील वागणुकीमुळे इतरांशी चांगले संबंध तयार होत असतात. त्यामुळे आपले व्यक्तिमत्त्व फुलत असते. समाजातही चांगल्या सवयी असणाऱ्या निर्व्यसनी व्यक्ती आवडतात म्हणून चांगल्या संगतीत वाढणे अत्यंत महत्त्वाचे असते त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात इतरांच्या पेक्षा वेगळे दिसून येते.

१२. संस्कृती – आपण आपल्या संस्कृतीत वाढत असतो त्या संस्कृतीचा कळत नकळत रूढी, परंपरा, मूल्य, राहणीमान आहार, पोशाख, शिष्टाचार यांच्या पद्धती अशा कितीतरी घटकांचा समावेश संस्कृतीमध्ये होत असतो. ज्यांची संस्कृती प्रगत आहे त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत असते. आपण कोणत्या घरात जन्म घेतला घ्यावयाचा हे आपल्या हातात नसते. पण आपण स्वतःला सुसंस्कृत करणे आपल्या हातात असते. अशारीतीने शारीरिक क्षमता, केशरचना, अलंकार, मनमोकळेपणा, शिक्षण, मित्र, संघ, सामर्थ्य, चांगल्या सवयी, अशा अनेकविध गोष्टी आपले व्यक्तिमत्त्व घडवत असतात म्हणून काही गोष्टी अनुवंशिक आहेत. काही पालकावर अवलंबून असते हे खरेच आहे पण सगळ्यात मार्ग काढत असताना आपल्याला स्वतःला कसे घडवायचे आहे हे ही तितकेच महत्वाचे आहे.



# गौरी गीत

**अंदाण द्या हो भाऊराया**

अंदाण द्या हो भाऊराया, काय देऊ गं बहिणाबाई
तुळशीमागली बाग शाही, हट्ट पुरव माझी आई
माझ्या कगव्या झुगर काळ्या, बंधू घडव नवीन माळा
नवीन माळेचा गं फासा रुंद, हिरवं लुगडं मला गं दंड
हिरव्या बुगड्याची निळी गं धडी,
धडी रुतली माझ्या गं पोटा
सांगली–मिरजचा रंग खोटा
बंधू हिंडतो चारी पेठा
हिरव्या शालूला काय गं तोटा.

**– कु. स्मिता वसंतराव पाटील**
बी. एड. २



# भारूड

**कानडा राजा पंढरीचा**

कानडा राजा पंढरीचा
वेदानाही नाही कळला अंत पार यांचा ।। धृ ।।
निराकार तो निर्गुण ईश्वर
कसा प्रगटला असा विटेवर
उभय ठेविले हात कटीवर
पुतळा चैतन्याचा ।। १ ।।
परब्रह्म हे भक्तांसाठी
उभे ठाकले भिमेसाठी
उभा राहिला भाव सांवयव
जणू की पुंडलिकाचा ।। २ ।।
हा नाम्याची खीर चाखतो
चोखोबाची गुरे राखतो

**– धनश्री दिलीप पाटील**
बी. एड्. २

# संपल्या त्या लेखण्या, उरली फक्त कारकुनी

**माळी रुपाली नामदेव**, बी. एड. भाग २

दहा पंधरा वर्षापूर्वी लेखन, वाचन, लेखक, संपादक, प्रकाशक या गोष्टींना असाधारण महत्त्व होते. कारण कोणतीही माहिती मिळवायची असेल तर, हा मनुष्यप्राणी पहिल्यांदा पुस्तकाकडे वळायचा. हळूहळू काळ बदलत गेला. टी.व्ही. आला त्याने बरेचसे लोकांचे आयुष्य गुंतवून घेतले. घरोघरी वर्षानुवर्षे चालणाऱ्या मालिकांचा अंत झाला. कालांतराने तोही काळ निघून गेला. मोबाईलचा शोध लागला. मोबाईलच्या शोधानंतर काही दिवसातच इंटरनेट हे मोबाईलमध्ये समाविष्ट झाले. खरं तर याचे खूप फायदे आहेत. संपूर्ण जगाचे एकत्रीकरण. पण याचा पुढे आमच्यावर विपरीत परिणाम होऊ लागला. आमची सर्वसाधारण विचारशक्ती म्हणजेच सदसद्विवेक बुद्धी कुठेतरी हरवून जायला लागली, आणि मग शेकडो माणसांची जागा अनेक यंत्रांनी घेतली. मानवाला भाषा, विचार आणि व्यक्त करण्यासाठी भरपूर साधने आहेत. फक्त सुखाच्या शोधात आपले संपूर्ण जीवन तो एका यंत्राप्रमाणे व्यतीत करतो.

आजकाल बहुतेक क्षेत्रात हेच सुरू आहे. पगारासाठी चांगली नोकरी, पगारात भागत नाही म्हणून भ्रष्ट कारभार आणि निवडलेले काम पूर्ण शक्तीने करायला आवडत नाही. अशा अनेक अडचणी आपले डोळे उघडे असतील तर दिसतील. सरासार विचार केला तर डोळ्यात विचारांचे बंड सुरु होतात. या आधी भारतात 'कर्म हाच धर्म' समजला जायचा. आता मात्र पैसा आणि सुख हाच धर्म समजून त्यासाठी कर्म केले जाते. मग त्या कर्मात मी किंवा माझी आवड असो किंवा नसो किती दिवस बंद डोळ्यांनी वास्तवावर पडदा टाकायचा. स्वातंत्र्यासाठी पेटून उठण्याचे दिवस गेले. आता मात्र कार्यासाठी पेटून रडण्याची वेळ आली आणि एकदा पेटलेली ज्योत संकटांच्या वाऱ्याने विझू नये म्हणजे झाले.

गावोगावी फिरत लोकांची व्यथा मांडणारे पत्रकार संपादक कुठे लपून बसलेत. काही कल्पनाच येत नाही. आजच्या नवोदित लेखक/लेखिका तरुण पिढीला प्रेम आणि विरह याच्या पलीकडे सुचणार तरी कधी? इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाच्या प्रभावामुळे लेखण्या बंद पडल्या. माझे साहेब सांगतात म्हणून मी लिहितो. अशी नुसती कारकुनीच उरली आहे. कारण आमच्या डोक्यात कधी इतरांच्या दुःखांचे वणवे पेटले नाहीत. त्यामुळे आमच्या लेखणीधारक मशाली रॉकेल ओतूनही सतत धूरच सोडत असतात. निदान मला तरी वाटते की आता देशात धर्मवेडे, प्रेमवेडे, सुखवेडे या सर्वांपेक्षा कर्मवेड्या लोकांची जास्तीत जास्त गरज आहे.

मला ते काम आवडते. कोणत्याही परिस्थितीत मी ते काम करून माझ्या कर्म तृप्तीचा आनंद प्राप्त करीन असा प्रत्येकाने निर्धार केला पहिजे. तेव्हा कुठे आपण महासत्तेची स्वप्नं उघड्या डोळ्यांनी बघू शकू. या देशातील सुवर्ण इतिहास लक्षात घेता माझे वागणे कितपत बरोबर आहे. याचा विचार व्हायला हवा. हा विचार जेव्हा करण्याची वेळ येईल त्यावेळी गरिबी, बेरोजगारी, प्रदूषण यासारख्या जटिल समस्या अल्प प्रमाणात का होईना पण सुटलेल्या असतील. मी जे काम करतो तोच माझा धर्म, जात आणि माझी कुळी. ते टिकवण्यासाठी आणि पूर्ण क्षमतेने करण्यासाठी मी शेवटपर्यंत प्रयत्न करीन असा आशावाद व कर्मवाद प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे.





# माझी माय मराठी बोली

**औंधे चारुशीला नागनाथ,** बी. एड. भाग २

मायमराठी माझी माऊली
अमृतधारा झरती बोली
मनात फुलती वसंत गाणी

माय जशी वत्सल, स्नेहमयी, अवर्णनीय अवीट अशी मायेची सावली असते तशीच आहे. माझी माय मराठी. माझ्या मराठीचे बोल कौतुके परी अमृतातेही पैजा जिंके असे ज्ञानदेव म्हणून गेले, ते अगदी मनाच्या गाभाऱ्यापासून. भाषेचा उगम माणसाच्या निर्मिती बरोबरच झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ध्वनीद्वारे व्यक्त होता होता मग विशिष्ट सांकेतिक ध्वनीचा एक समुदाय तयार झाला व त्यातून भाषा जन्माला आली. मग त्या भाषेला प्रत्येक टोळी द्वारे वेगवेगळे संकेत ठरले आणि तिथून मग भाषेचे निरनिराळे प्रकार उदभवले. अशी एक ढोबळ संकल्पना भाषेच्या उगमा विषयी आपण बांधू शकतो. मानवाचा जसा जसा विकास घडत गेला तस तशी भाषा सुद्धा विकास पावत गेली. भाषेची अनेकविध स्थित्यंतरे घडत गेली. अगदी गर्भावस्थेपासून मुलाच्या कानावर जे ध्वनी पडतात ते भाषाच्या माध्यमातूनच. भाषा म्हणजे विचार व्यक्त करण्याचे साधन. सुरुवातीला मौखिक असणारी भाषा सांकेतिक ध्वनीचिन्हाच्या रुपात अक्षय म्हणजे अक्षर लिपिमध्ये बद्ध झाली. मूल जन्माला आल्यापासून सतत कानावर पडणारी भाषा मूल आपोआप आत्मसात करते. आणि मग तीच त्याची मातृभाषा ठरते. अन प्रत्येकाला आपली मातृभाषा मातेसारखीच असते. भाषेतून समाजाची जडणघडण दिसते. प्रगतीच्या अवस्था स्पष्ट होतात. आपली मराठी भाषा म्हणजे इंडो इराणियन गटातली आर्य भारतीय शाखेतील अर्वाचीन अवस्था.

माझी माय म्हणजे मायमराठी. मायेच्या ममतेचा ठायी ठायी प्रत्यय देणारी. अंगभूत गोडवा असणारी, अगदी भुईकमळा सारखी उमललेली माझी मराठी.... आईमध्ये जशी विविध रूपे एकवटलेली असतात. तशी विविधरूपे माझ्या मराठीची आहेत. भाषिक वाङ्मय अक्षर होण्याआधीपासूनच प्रवास पाहिला तर अनेकांनी रूपे मराठीची दिसतात. प्रत्येक बारा मैलावर भाषा बदलते म्हणतात. आपल्या मराठीच्या पण अगदी थोड्या थोड्या स्वरूपाचे ढोबळ बदल दाखवणाऱ्या बोलीभाषा आहेत. जसे अहिराणी, वऱ्हाडी, मालवणी, कोकणी, बोलीभाषा आणि लोक साहित्य ह्या खरेतर त्या त्या समाज जीवनाचा आरसाच! प्रमाण भाषा अन बोली भाषा असे दोन प्रकार भाषेचे आहेत. लोककथा लोकगीते, कहाण्या, उखाणे, कोडी, कुटे, म्हणी, वाक्प्रचार, पोवाडे, अभंग, ओव्या, आख्यायने अशी समृद्ध लोकसाहित्याची परंपरा मराठी भाषेची आहे. मराठी मनाच्या मानसिक जडणघडणीचा प्रवास मराठी भाषा दाखवते.

मराठी भाषा सप्ताहामुळे एक मराठीच्या इतिहासाला उजाळा देताना जाणवते. काय समृद्ध परंपरा आहे आपली मराठीची. काळाच्या ओघात काही परंपरा लोप पावल्या जातात की काय अशी भीतीही निर्माण झाली आहे. जातेच नष्ट झाल्यामुळे जात्यावरच्या ओव्या गेल्या. हल्लीच्या धावपळीत जगण्यातला निवांतपणाच हरवत चाललाय. त्यामुळे झोपाळ्यावरची गाणी कालबाह्य झाली आहेत. मराठी लोकगीतातून मानवी मनाचे ऋणानुबंध मोठ्या जिव्हाळ्याचे गुंफलेले आहेत. समाजाचे अंतरंग, समाजाची भावना, चालीरीती, संस्कृती याचे प्रतिबिंब माझ्या मराठीत पडलेले आहे. महाराष्ट्राची लौकिक परंपरा मराठी भाषेतून अगदी सुंदरपणे व्यक्त झाली आहे. या मराठीच्या लोकपरंपरेचा मागोवा घेतल्यास दिसते.

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग आणि मन
जीवाही अगोज पडली आघात
येऊनियां नित्य नित्य कार

असा तुकोबारायांचा अभंग असू दे नाही तर

नात्या तू ईसवरा नको मला जड जाऊ
वयाच्या दुधाचा सया पाहतात
यासारख्या जात्यावरच्या ओव्या असू दे, नाही तर
कळफाच्या फुलावर बसले पक्षी
........ रावांच नाव घेते.....
चंद्र सूर्य आहेत साक्षी

यासारखे उखाणे असू देत. अत्यंत सुगम सुलभ पद्धतीने ही माय मावली आपल्यापर्यंत पोहते. अगदी आतल्या गाभ्यातून स्त्रवणारी मराठी तिच्या अंगभूत गोडव्यामुळे मराठी मनाशी अजून जवळीक साधते. मराठी मनाचे समर्थन, माध्यम वाहक, स्वप्नरंजक, मनोरंजन करणाऱ्या या माझ्या मायेला शतशः प्रणाम.

खूप प्रकार कालबाह्य ठरले आहेत. त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प आपण मराठी भाषिकांनी घेतला तर काही अवघड नाही. मराठी भाषेच्या कौतुकासंबंधी मला वेळोवेळी प्रकर्षाने आठवतात त्या कविवर्य सुरेश भटांच्या ओळी...

लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
आमुच्या मनामनात दंगते मराठी

आमुच्या रंगारंगात रंगते मराठी

काळाप्रमाणे सूक्ष्मसे बदल दाखवत हा मराठीचा प्रवास अखंड चालू आहे. मनामनाचे सृजन घडवणाऱ्या या अनुकूल भूमीला माय मराठीला म्हणावेसे वाटते.

आजि सोनियाचा दिनु। वर्षे अमृताचा धनु।

असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. त्यांच्या या अमृतमयी शब्दांची बरसात मनाला सुखावून जाते कारण मराठीच्या म या अक्षरात मी माझी मराठी, मायबोली अशी या अशा सर्व म कारांत मी. माझे, महान, मानसन्मान असे सर्व म सामावलेले आहेत आणि म्हणूनच आम्ही म्हणतो, मराठी असे आमुची मायबोली. इतर भाषा या तिच्या भगिनी आहेत. त्यांच्याशी आपले नाते मावशीचे– म्हणजे त्यातही परत म चाच आरंभ. मग या भाषा मावशींशीही आपले नाते आहे, ते गोडच असणार व गोडच असले पाहिजे.

जो मराठी द्वेष्टा नाही, जो मराठीचा राग–द्वेष, दुस्वास करत नाही तर उलट ज्यांच्या रोमा–रोमात मराठीची आपुलकी, जिव्हाळा, प्रेम असेल असे सर्वजण मराठीच होय. अशा व्यक्तींकडून मराठीचा अपमान कधीच होणार नाही. तर उलट मराठीच्या उन्नत्तीला व प्रसाराला त्यांचा हातभारच लागेल अशा या मराठीचे कौतुक काय सांगावे! मराठीत उच्चार, व्यंजन, स्वर यांत गल्लत तर नाही. मराठी भाषा ही अत्यंत तरल, सूक्ष्म व संवेदनशील आहे. अशा या संपन्न परिपूर्ण भाषेचा जगातील ८००० भाषांमध्ये १५ वा क्रमांक लागतो.

अशी ही मराठी काळाच्या ओघात टिकून राहील का? तर या प्रश्नाचे उत्तर होय असेच असेल. सातासमुद्रापलीकडे असलेली पाश्चात्य भाषा आपण शिकतो कारण त्याचे विस्तारित क्षेत्र व सहज साध्या असा अर्थार्जनाचा हेतू असू शकतो. परंतु पाश्चात्य भाषा आपल्याला शिकावी लागते तर मायबोली आपल्या रक्तात, तनामनात असते ज्यामुळे आपल्या संस्कारांचे पालनपोषण होते आणि आपल्या अस्तित्वाची ती खरी ओळख असते. आणि म्हणूनच अशी ही मराठी भाषा प्रत्यक्ष व्यवहारात वापरणे, मराठीविषयी सुलभ ज्ञान देणे, मराठी भाषेला वैश्विक स्वरूप देणे, समाजाला तिची उपयोगिता पटवून देणे. तसेच विविध मराठी साहित्य प्रकार लोकांपर्यंत पोहोचवणे अशा अनेक गोष्टींनी भाषा टिकून राहते. इतकेच नाही तर तिची प्रगती होते. त्यासाठी आपण मात्र प्रयत्नशील असावे.

या प्रयत्नासाठी आपण वचनबद्ध असले पाहिजे व जागतिक मराठी दिवसाच्या निमित्ताने आपण याचा आढावा घेतला पाहिजे व स्वतःच एक मराठी म्हणून तपासून पाहिले पाहिजे की आपण या वर्षी किती प्रगती केली? घटनेने आपल्याला जो अधिकार दिला आहे त्याचा आपण मान राखून किती वर्चस्व प्रस्थापित केले याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. परंतु एक गोष्ट निश्चित जोपर्यंत आपल्याला आपल्या जन्मभूमी, कर्मभूमीची मनापासून ओढ–प्रेम वाटत नाही तो पर्यंत सर्व व्यर्थ आहे. जेव्हा आपल्याला कोणी विचारले की, तुम्हाला तुमची भाषा नीट येते का? याचे उत्तर थोडी–थोडी येते. असे आले तर मग तो आपल्याच अस्तित्वाचा अपमान असेल. मग अशावेळी अशा व्यक्तीकडून भाषेचा मान व तिचे अस्तित्व कसे राखले जाणार?

म्हणूनच आपल्याला आपली ओळख व अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर भाषा टिकवणे–जपणे गरजेचे आहे.

# गुरु ऋण

साध्याशा वेषात
उच्चकोटीचे संस्कार जपणारे गुरुवर्य
नाही खरं विसरलो आम्ही शाळेला
संसाराचा रहाटगाड्यात अन
जग रहारीत आजही जपलंय तुम्हाला
आजही वाटतं
त्या पोक्त आणि श्रेष्ठ खोडांना
घरी बोलवावं
साऱ्या आठवणी जागवाव्यात
कधी रागीट नजर तर कधी
संस्कारांची केलेला खैरात
सारं सारं अश्रूंनी मोकळं करावं
अन ऋण व्यक्त करावं
घाला सरांना शर्ट पॅन्ट
अन छान साडी बाईंना
सांगावी आपली प्रगती
अन द्यावं सारं श्रेय त्यांना
घ्यावीत टवटवीत फुलं
वहावीत त्यांच्या पायावर
अनं छानसं पुस्तक द्यावं
त्यांच्या हातावर
गुरुवर्य
असं समजु नका
आम्ही तुम्हाला नाही आठवत.
सारं शिकवून ही तुम्ही आहात रिक्त
तुमच्या ऋणातून होऊ का
कधी आम्ही मुक्त?
म्हणूनच हे गुरुऋण झालंय व्यक्त.

# वाचन : एक उत्तम छंद

**पूनम गुणवंत शिंदे,** बी. एड. भाग २

असा धरी छंद । जाई तुटोनिया भावबंध ।।

संत महात्म्यांच्या या शिकवणीप्रमाणे आपण कुठला न कुठला तरी छंद जोपासायाला हवा. छंद जोपासल्याने आपल्याला रोजच्या धकाधकीच्या, चाकोरीबद्ध जीवनाचा कंटाळा येत नाही. कुणाला पोस्टाची तिकिटे, जुनी नाणी जमवण्याचा छंद असतो. कुणाला गाण्याचा, तर कुणाला चित्र रेखाटण्याचा छंद असतो. प्रत्येक जण आपल्या या छंदातून मनमुराद आनंद लुटत असतो.

अशा या अनेक छंदांपैकी, 'वाचन' हा एक उपयुक्त व उत्तम असा छंद आहे. वाचनाचा छंद आपण इतरांना त्रास न देता जोपासू शकतो व हा छंद खूप खर्चिकही नाही. दिवाळीमध्ये महाराष्ट्रात दिवाळी अंक शेकडोंच्या घरात प्रसिद्ध होऊन त्याची वाचकांना जणू मेजवाणीच मिळत असते. सुट्ट्यांच्या काळात ठिकठिकाणी भव्य पुस्तक प्रदर्शने आजही भरतात व वाचकांचा त्याला प्रचंड प्रतिसादही मिळतो.

वाचनाचा छंद केवळ आपली ज्ञानाचीच भूक भागवत नाही. तर मन प्रसन्न करणारे, उत्साही करणारे असे मनोरंजनही करते. दूरच्या प्रवासातील कंटाळवाणा रिकामा वेळ वाचनाच्या छंदामुळे सुखकारक ठरतो. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या थोर देशभक्तांना, क्रांतिकारकांना जेव्हा कारावास भोगावा लागला तेव्हा त्यांनी ब्रिटिश सरकारला पुस्तके उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली. वाचनाच्या या छंदाने त्यांची ज्ञानाची भूक भागून या कठीण प्रवासात पुस्तकांनी त्यांची साथ केली. अशाप्रकारे दुःखाच्या प्रसंगी, एकटे असताना, प्रवासात पुस्तके आपली साथ करतात. कदाचित मित्र कंटाळतील. एक वेळ आईवडीलही थकतील. पण पुस्तके कधी कंटाळा करत नाहीत की थकतही नाहीत. आपल्याला कशीही, कुठेही हवी तेव्हा, हवी तिथे साथ करायला ती सदैव तयारच असतात.

उत्तम पुस्तकाच्या वाचनात आपण आपल्या चिंता काही वेळा का होईना, पण विसरतो. उत्तम पुस्तकांच्या वाचनाने मिळणारा आनंद उच्च दर्जाचा असतो. सतत उत्तमोत्तम वाचन केल्याने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन व्यक्ती बहुश्रुत होते.

वाचनाच्या छंदामुळे आपल्या जीवनात येणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्यास प्रेरणा मिळते. उदा. 'वीणा गवाणकर' अनुवादीत 'एक होता कार्व्हर', 'विठ्ठल कामत' यांचे 'इडली ऑर्कीड आणि मी' ही आणि इतर पुस्तके आयुष्यातील अडचणींवर मात करत पुढे प्रगतीपथावर जाण्यास प्रेरणाच देतात. 'शिवाजी सावंत' यांची 'मृत्युंजय', 'युगंधर' ह्या पुस्तकातून हजारो वर्षापूर्वीच्या प्राचीन ऐतिहासिक, पौराणिक काळाचे वर्णन वाचनात त्या कालखंडात फिरून आल्याचा अनुभव मिळतो. त्या काळातील रितिरिवाज, खानपान, परंपरा, व्यापार उदीम, शिष्टाचार इ. घटकांची माहिती मिळते. त्यामुळे वाचनाच्या छंदातून केवळ ज्ञान न मिळता भूतकाळातील कालखंडाची भ्रमंती केल्याचा सुद्धा अनुभव प्राप्त होतो.

आपल्या मराठी भाषेत उत्कृष्ट दर्जाची साहित्य निर्मिती विविध साहित्य प्रकारांतून झालेली दिसते. आध्यात्मिक ग्रंथ वाचनाने मनाला उभारी येते. उत्तम अभंग, काव्य वाचनाने रसिकता हा गुण वाढीस लागतो. ललित साहित्याच्या वाचनामुळे आपणास अनुभवांच्या पुनःप्रत्ययाचा आनंद घेता येतो. वाचनामुळेच माणसाची विचारशक्ती, कल्पनाशक्ती, संवेदनशक्ती अशा शक्तींचा विकास होतो. म्हणून जीवनाच्या सर्व अंगाचे दर्शन घडवणारा व मनावर संस्कार करणारा वाचनाचा आनंद हा श्रेष्ठ आनंद नक्कीच आहे.





# Life Is Beautiful

## Shaikh Zakiya Dastgir, B. Ed. 2

"Life is not Measured by the Number of BREATHS" We take, but by the MOMENTS that take our BREATH AWAY".

Life is beautiful, but not always. It has lots of problems you have to face everyday. Don't worry though all these problems make you strong. It given you courage to stand alone in future. Life is full of moments of joy, Pleasure, success and confort punctuated by misery, defeat, failures and problems.

There is no human being on Earth, Strong, powerful, wise on rich, Who has not experienced, struggle, suffering or failure. You have to work hard to reach to the highest position. Life is full of paths, you just have to choose the right one. Life is interesting and amazing like the stars up in the sky.

With no doubt. Life is beautiful and full of celebrations. However you should always be ready to face adversity and challenges. There are difficult situations in life as well. The careful !

You might get hurt too have. Life is sometimes too selfish to think about yourself. Then life is too hard to handle. falling in love. People tend to fall in love now a days but I personally think the right time has to come..... You might also get hurt in love. you might be broken-hearted as the people say.....

Life is the place where people treat everyone differently. Racism Exists as well as bullying. People tend to say bad stuff behind people's back. There are millions of people using horrible words to call people, People use people everyday, "Life is not that easy in my view".

Sometimes all you want to do is sit alone and question yourself with hundred of questions.

* Am I ugly the people say???
* Why don't I have any friends ?
* Why is the world so hard to live in ?
* What do I look like in other people's eyes ?
* Why don't I have the some colour of the skin as everyone else?
* How can I make others happy ?

These questions don't not stop. you ask those questions over and over again. When you don't have any answer. you want to scream out loud of cry....

So never think like this I don't understand what people get from making others unhappy and upset.

So think twice and enjoy your life. Every minute be happy. "Every single one of you there in the world have your own Beauty". "Everything is Beautiful ".

So don't sit there saying, I'm ugly I'm failure or PRETTY or Handsome or Else.... Don't Care about what people Say.

"RUMORS ARE SPREAD BY HATERS, CARRIED BY FOOLS AND ACCEPTED BY IDIOTS".

Treat people the way they treat you. Be strong, achieve your geals. Just ignore Negative people.

* Life is too short to save it for tomorrow.
* Don't give up and Hope always !
* Love forever !! Do what your heart says.....
* "DREAM AS MUCH AS YOU LIKE AND MAKE IT TRUE !"

You ONLY LIVE ONCE SO MAKE THE MOST OF IT !

" STAY HOME STAY SAFE ENJOY YOUR LIFE".

# Teacher

Teacher is a sun,
Who gives a light of life,
Teacher is a Sea,
Who gives a water of life
Teacher is a Wind,
Who gives a message of Kindness
Teacher is a Soil,
Who gives a food of knowledge
Teacher is a storm,
Who destroys fears and worries.
Teacher is a Nightingale,
Who kills his own Sorrow.
Teacher is a Mother,
Who cares of his students.

**- Jyotsna Suresh Pawar,** B. Ed. II

# COVID-19 Vs Superstition and Rumours

## Shaikh Zakiya Dastgir, B. Ed. 2

Recently there has been as spike in covid-19 cases In India. Right now there is a cases in India. The cause behind such a sudden increase is related to a Religious Congregation in Delhi. A ritual being followed by these sects of people which requires close contact among the people attending the congregation. This has led to the spread of the virus among people. Attendees coming from many countries and even in many parts of India itself has become a cause of concern. Even some cases related to the congregations have been found in Jammu Kashmir.

Prime Minister Narandra Modi said In the name of belief people have been seen gatheding in places ploating social distancing nooms. Hense there is a need for education them about the Importance of social distancing to check the spread of the deally virus he also said.

Addresing organisaions Involved in social work via video. Conferming here Modiji Said they can play a huge role in arranging basic necessities for the poor and can also dedicate their medical facilities and volunleers to serve patients and the needy.

Facebook pages were floated with video claiming the pandemic was natures revege on making for eating non-vegetable food. The whan market in china, through to be the epicentre of the disease.

Instead of observing precausions to prevent the spread of the virus. Some performed pujas in agra, prayaers were offered to the yamuna river. Which according to hindu mythology is the sisters of yama. The God of death. There were also reports of puja where an effigy of the virus was feed halwa puri to 8 atiate its hunges.

Some religious preachers in clips circulating on social media. Claimed god sent the coronavirus to punish and destroy their enemies.

Soon after the autbreat assam health minister himanta Biswa sarma appealed to muslims not to gathere in masques thought this appeal was received well by many others were hostile. In many parts of state muslim men took part in processing claiming this appeal was a threat to Islam.

* Super stition like :-

1] If i get Infected with the virus, God will save me, God is my mask and sanitizea, Nothing happen withouts the will of god so, if I get Infected. Its God will.

2] Drinking something thod has been said in some belief system having some medical value will save them from getting Infected.

3] People should not be stopped from going some secret places even if they get Infected dying at that places will get them heaven directly.

4] Applying turnaric paste on left leg protect from corona virus.

5] Applying mustured oil on nose protect from corona virus

6] Planting a Tulsi tree in front of house protect from corona virus.

* Rumours like :- Friends at such a time you should be coutions, as knowing on unknowing rumours spocad fast, They have a Tendency to travel fast, I appeal to you, do not believe in such rumours and superstitions.

The Prime Minister said it very Important for people to follow the Instructions and active of the medical fratewily.

Place donot take any such a carelessess can put your life in more danger. I am sure that even citizens will follow the direction of the government and local administration.



# Inspirational English Quates to Help you Improve your English Language Learning

Sutar Asma Shahabuddin, B. Ed. 2

While the journey in learning another language takes time and it undoubtedly is filled with obstacles, reading a quote or two sometimes gives us the inspiration we need to continue. Here's hoping that these quotes do just that. That they inspire. That they inspire and they offer renewed strength to continue and reach your gools.

1] "If you talk to a man in a language he understands,

that goes to his head. If you talk to him in his own language, that goes to his heart".

- Nelson Mandela.

Have you taken time to notice what others feel like when you attempt to speak their language even if it is a few words? It's okay if you make mistakes. Remember, it is the effort that truely counts. How do you feel when someone tries to speak your native language? I bet they feel proud of you and honoured that you would attempt to communicate with them in their language.

2] One language, sets you in a corridor for life. T wo languages open every door along the way

- Frank Smith.

Perhaps this quote means that by knowing more that one language, your whole future expands. There are opportunities for learning and for future careers. There are many careers that use a second language.

3] To have another language is to passess a second soul.

- Charlemagne.

This quote simply means that you can understand so much more. because you have topped into another culture. By doing so, you can think understand and feel another culture.....which is like having a second soul.

4] Language is the road map of a culture. It tells you where its people come from and where they are going

- Rita Mae Brown.

Language is related to culture. When you study another language, you being to understand the culture that uses this language. You see the history of these people and where they are going in the future. You expirence their world.

5] Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.

- Oliver Wendell Holmes.

Language is the way that you express yourself. You think in world and you exchange thoughts with words. That is why language is so important. Without language you would not be able to think about the world and connect to others with these thoughts. You would not be able to able to listen to others and understand them.

6] I admine people who dare to take the language, English, and understand it and understand the melody.

- Maya Angelou.

This quote from a famous writer gives creadit to the person who readly understand words [e.g. apoet, an orator, a writer, etc.] in any language to a cretain level that they know the beauty [i.e. the melody] of the words. They know what words mean and how to use them.

7] The limits of my language mean the limits of my world.

- Ludcuing Wittgenstein.

If your language skills and progress (with a second language) are not a high level, then this holds you back from engaging in life and sharing what you really are.

8] Language is "the infinite use of finite means"- Wilhelm Von Humboldt.

Remember, it is possible to communicate big ideas with relatively limited language. Don't feel like you need perfect English before you can go out and have interesting conversations with other people.

9] A different language is a different vision of life - Federico Fellini

When you know another language, you get glimpse

into how a different people think and live. That is different vision of life. Your world open up to include that other world.

10] Language exerts hidden power, like the moon on the tides. - Rita Brown.

We may not unclerstand on see how the moon causes the tides, but it does have a constant impact. This is much like language with its hidden potential. Language allows un to do so much more that we don't readlly stop to think about the power behind language just like tides which seem so natural, language appears to be natural, too.

# शेतकरी गीत

## जगाचा पोशिंदा...

पोशिंदा साऱ्या जगाचा,
फिरतो अनवाणी पायानं
साथीला त्यांच्या दिसभर
बैल मात्र नावानं....
कष्टाची ती भाकर,
मेहनतीचा तो घाम,
काळ्यामातीला ही फुठला हा अश्रूंचा बांध...
न कसली तक्रार, न कसली मौज,
बळीराजाची करतो पूर्ण तो हौस
आजकाल लोकांचा सुटत चाललाय हात,
बळीराजाला मात्र बैलच देती साथ
अख्या जगाचा पोशिंदा शेतकरी
शेतकऱ्याचं मायबाप (बैल) तेवढं कष्टकरी,
कष्टाची ही सवय न्यारी,
राब राब त्याने राबावं
गोड मात्र भाकरी
सर्वांना लागावं...
बळीराजाचा तो यार खास
आयुष्यभर झिजून ही त्याला लागली नाही आस....

**– धनश्री दिलीप पाटील**
बी. एड्. २

# शेतकरी गीत

## शेतकरी राजा

काळ्या आईचा माझा बाप सेवेकरी
घाम गाळतो मातीत, तेव्हा येतं पीक पदरी
बाप माझा शेतकरी, करी पंढरीची वारी
विठुराया सोबतीला, भार जगाच्या त्याच्या डोईवरी
काळाच्या ओघाने कशी फिरविली पाठ
कष्ट पाण्यातच गेले, झाली कष्टाचीच राख
बाप माझा सरणावर...
तरी भाव नाही त्यास कष्टापरी
डोळ्यातील अश्रू वाहती दिन रात
कंठ दाटूनी येतो फक्त कष्ट दिसे नशिबात
बाप माझा शेतकरी आहे देशाचा मानकरी
माणुसकीच्या त्या गावातील मेहनतीचा या राजाला
माझा प्रणाम मनोमरी

**– कु. स्मिता वसंत पाटील**
बी. एड्. २





# Today's Youth

Dr. Archana S. Chikhalikar (Asst. Professor), S.S.S.Mahila Shikshanshastra Mahavidyalya, Tasgaon.

**Introduction :**

Youth today is an over-civilized living creature on the earth. We have the evolution process undergoing continuously at every segment of life. Our youth have also evolved much ahead of the imaginations. They have incroporated both the bests and worsts to a very high extent. The gallop that the youth has taken in moulding and modifying their lifestyle in much beyond the imagination capacity of an average human being. The youth have developed their race, their sect to the heights that we feel the necessity to discuss their culture in specificity here

**Youth today-positive front**

Our present age youth, the stepping stones of the future world, have many positive points to be appreciated and encouraged. Our youngsters definitely have the warmth in their blood which ignites them to gear up and succeed in every possible attempt they make. All they demand is attention and encouragement.

Let us discuss in brief a few areas of their specilization :

**Determination and Dedication**

Our youngsters have a firm determination. This gives them stamina and immense courage to accomplish their target on time with utmost perfection. If we closely visualize, their dedication and sincerity toward the work increases day-by-day.

**Withstanding the stressful circumstances :**

Our young generation has s very good capacity to withstand the stressful situation. They can manage any and every circumstance in a rewarding manner. Gender is no bar to the withstanding ability. Everyone is equally tested and treated in the world of employment and performance and the parameters are very competitively met by our charming youngsters.

**Patriotism**

Patriotism is no question for the present age youth. They are very much eager to serve their nations till the last breath of the life. Every youngster gets heated up when the situation arises to defend his/her motherland. Everyone performs and devotes their part in the best possible way to serve their nation.

**Preview of life**

Youth today has a practical approach and they foresee the life in the same way. They have the talent of accepting the fact and actuality of the life. Today's youth is well prepared to face the worst and they get themselves well equipped before-hand to face the situation effectively and efficiently.

**Unprejudiced approach**

Our young generation is matured and can analyse the situation with a balanced state of mind to reach to the best possible resolution for any concern without any bias.they don't rush with the solution in any stress and take required time to reach to a dirm decision.

**General and social awareness**

The youngsters are well aware of the balancing equations of life. The general IQ and the social awareness make them help in the upliftment of the rural segments of the world. They are the ones who plan and promote the development of the under-developed nations.

**Youth today-negativity prevailing :**

Though we have a lot many points in favour of the present day youth, still it is a bitter truth that the part of youth is flowing away with the extremities of the abstracts of the emotions. This yielding tendency has led to the increasing concern of violence and rage in to the society. Taking a brief preview of the negativities of the present age youth.

**Over-socializing**

Though it is good to a extent that the gender bias is removed from the society due to the socializing nature of the youth, still the over-socializing nature has transformed the relations and the physical relationship is treated as a game of the youth. Such a careless move by the young generation is leading to lot many medical

complications in the later part of their lives.

**Rage :**

The warm blood of the young gets heated up much frequently. The youth lacks patience and they all need their tasks to be completed as and when required and that too immediately. The loss of patience and the hot temper is often the cause of violence and rage. The increasing terrorism in the world is one of the examples of their rage and yielding tendency.

**Pub and disco age**

Some sort of entertainment is understandable at the young age. But carrying on with the bad habits like smoking and drinking and getting addicted to the pub culture is definitely not a good sing of the future world. Youth treats the life as a game and enjoys the present to the fullest. Though it is good to live at the present, but one need to wisely plan for the future as well. This is what some of our youth fail during the peak years of their life. The junk food is again a bad virtue of the youth culture.

**Over dependency on technology :**

Our young generation is tech-savvy. They can complete every task in a click. The cyber world have given them a life of ease and comfort. The tech savvy youth have lost the values of physical exercise and are landing into poor health conditions in tender age. We have reached an era where our youth in unable to perceive anything without the technology. They have completely become dependent on the technology. Instead of humans operating the systems, the technology is handling and controlling the present day youth.

**Fall in the moral values :**

Young generation has definitely lost the moral and humanitarian values. All they are marching towards is wealth and property. They want easy and instant money for that sake they cross the limit also. They lack time for friends, family and loved ones. They lack the values of respect, affection and care.

**Impact of Society :**

Society definitely plays a very important role in the shaping and re-carnation of the youth. The encouraging environment definitely gives good results. But our society is also lacking the moral values and everyone has become egoistic and self-centred. Nobody cares to appreciate any good values in their vicinity. Everyone is busy is portraying their false face up. With such a demotivating surrounding, our youth is definitely having a sinking heart and downfall in their progress.

**Conclusion :**

It is easy to conclude the topic, but the discussion will never cease. The youth definitely need attention and appreciation. The youth is like the clay in hands of the sculpture. The more careful the sculpture is the better is the resulting statue. Our youth requires to be moulded carefully and tactfully. All that we need is the encouraging society who could uplift the young generation and create a better tomorrow.



# ◆ विज्ञान व गणित विभाग ◆

* विज्ञान विभाग प्रमुख *

प्रा. सौ. प्रभा सयाजीराव घोरपडे

* गणित विभाग प्रमुख *

प्रा. डॉ. अनिल तानाजी पाटील



# कोरोनाने घेतला - परीक्षेची अग्निपरीक्षा

**टकले अपर्णा गणेश**, बी. एड. भाग २

गेले काही महिने शाळा, कॉलेज पूर्णपणे बंद आहेत. याचे एकच कारण आपणांस पुढे दिसत आहे. ते म्हणजे कोरोना व्हायरस. हा व्हायरस चीन मधून वूहान शहर येथून उदयास आला. हा साधा सुधा व्हायरस नक्कीच नाही. कोरोना व्हायरस चा उद्‌भव चीन मधील वुहान शहरातून झाला. तेथे विविध प्राण्यांचे मांस उपलब्ध करून देणारी मोठी बाजारपेठ आहे. या बाजारातूनच वटवाघळाचे किंवा सापाचे मांस खाल्ल्याने कोरोनाचा उद्‌भव झाला. अशी एक थिअरी मांडण्यात आली. पुढे चिकन खाण्यापर्यंत ती ताणली गेली. पण वास्तविक पाहिले तर असे काही नाही. कोरोना हा संसर्गजन्य आजार आहे. या व्हायरस ने पूर्ण जगाला वेड लावले आहे.

कोरोना व्हायरसमुळे बऱ्याच लोकांवर त्याचा परिणाम होत चालला आहे. या विषाणूमुळे कित्येक जणांचे जनजीवन विस्कळीत होत चालले आहे. कित्येक लोकांना एकवेळचे पोटभर अन्न सुद्‌धा मिळेना. उपसमार यामुळे कित्येक लोक मृत्युमुखी पडले आहेत. कारण कधी अशा घोषणा ऐकल्या आहेत का? एक मीटर चे अंतर ठेवा, शिंकताना, खोकताना, नाकातोंडावर रुमाल ठेवा. साबणाने वारंवार हात स्वच्छ करा, सॅनिटायझर वापरा. अशा बऱ्याच सूचनांचे पालन आपल्याला आज करावे लागत आहे. ते फक्त आणि फक्त कोरोना व्हायरस मुळे. कित्येक विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. कित्येक कामगार, मजूरी करणारे मजूर तसेच शेतकरी इ. लोकांचे जनजीवन विस्कळीत होत चालले आहे. गेले काही दिवस लॉकडाऊन घोषित केले होते. त्यामुळे बऱ्याच लोकांना त्याचा फटका बसला आहे.

विद्यार्थी मित्रांची तर अग्निपरीक्षा आता सुरु आहे. गेले दोन ते तीन महिने जितका लॉकडाऊनचा पोरखेळ रंगला आहे. तितकाच विविध परीक्षांचाही पोरखेळ चाललेला आहे. या निमित्ताने विद्यार्थी व एकूण शिक्षण पद्धतीच्या त्रुटीच समोर आणल्या, असेही म्हणायला हरकत नाही. त्यापेक्षाही कोरोना नावाच्या विषाणूने व त्याच्या सांसर्गिक गुणांनी एकूण मानवी बुद्धीच्या मर्यादा स्पष्ट केल्या, असे म्हणायला हरकत नाही. कारण, कोरोना हा नैसर्गिक प्रणालीतून उद्‌भवलेला विषाणू नाही. तर मानवनिर्मित संकट असल्याचे सत्य एव्हाना जगातच्या सर्व क्षेत्रातील जाणकारांनी मान्य केलेले आहे. त्यामुळे त्यासाठीचा दोष अन्य कुणावर नसून, मानवावरच येऊन पडतो. कारण माणसाने विज्ञानाचे दालन उघडले आणि त्यावरील संशोधन करताना ताळतंत्र राखले नाही. याचा हा परिणाम आहे. त्यातून हा अदृश्य म्हणावा असा सैतान जन्माला घातलेला आहे. त्यातून एक-एक मानवनिर्मित व्यवस्था जीवनशैली किती सदोष व अपुऱ्या आहेत. त्याची साक्षच आपण अनुभवत आहोत. त्यापैकीच एक शिक्षण व्यवस्था आहे. गेल्या दीड-दोन शतकांत तयार झालेली आधुनिक शिक्षणप्रणाली किती अपुरी व अडचणींची आहे त्याचा साक्षात्कार कोरोनाने घडवला असे म्हणता येईल. कारण शिक्षण या क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असलेले व त्यासाठीच्या व्यवस्थांचे नियंत्रण व अंमलबजावणी करणारे अशा सर्वांवरच आज हात टेकण्याची वेळ कोरोनाने आणलेली आहे.

जेव्हा कोरोनाच्या लागणीने भारताला विळखा घालायला सुरुवात केली, तेव्हा ऐन परीक्षांचा मोसम सुरु झालेला होता आणि दहावीच्या देशभरातील परीक्षांचे काही पेपर झालेले होते, तर काही बाकी होते. अशावेळी तडकाफडकी लॉकडाऊनची घोषणा करावी लागली. ती अगोदरच करायला हवी होती. असेही काही शहाणे आज सांगतात. तसे झाले असते तर झाल्या तितक्याही परीक्षा उरकल्या नसत्या. निदान तोपर्यंत बहुतांश पेपर्स झालेले असल्याने त्यांचा आधार घेऊन शालेय वा माध्यमिक विद्यार्थ्यांना सरासरी गुण देऊन निकाल लावण्याची पळवाट तरी उपलब्ध आहे. पण पदवी परीक्षांचे काय करायचे? त्यांची तर सुरुवातच झालेली नव्हती आणि त्यातही तंत्र वा उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षाच सुरु होऊ शकलेल्या नव्हत्या. साहजिकच, त्यांच्या परीक्षांचे काय करायचे हा यक्ष प्रश्न होऊन बसलेला आहे.

या सर्व परीक्षांविषयी कोणी निर्णय घ्यायचा आणि कोणाचा निर्णय अंतिम मानायचा, याविषयी काही स्पष्ट नाही. या परिस्थितीत पुरते गोंधळून जाण्याची वेळ आलेली आहे. प्रश्न कुठला, कोणाचा व कोणी सोडवावा याचाही थांगपत्ता नसल्याचे सत्य कोरोनाने समोर आणलेले आहे.

एकूणच जी शिक्षण पद्धती आपल्याकडे वा इतरत्र कार्यरत आहे. त्यात परीक्षा व तिच्या निकालांना इतके महत्त्व आलेले आहे की, परीक्षा देणारा विद्यार्थी, त्याचे शिक्षण व ज्ञानार्जन अतिशय दुय्यम होऊन गेले आहेत. त्यापेक्षा ज्या मुशीत त्या मुलांना ढकलले जाते. त्या साच्याला अधिक महत्त्व आले आहे. त्या मुलाने किती ज्ञान संपादन केले. तो अभ्यासातून काय काय शिकला यापेक्षा त्याने परीक्षेत किती गुण मिळवलं. त्याचे प्रमाणपत्र अधिक महत्त्वाचे झाले आहे. तो विद्यार्थी वा तसे कोट्यवधी विद्यार्थी दुय्यम किंवा नगण्य झालेले असून, परीक्षेचे

पावित्र्य निर्णायक महत्त्वाचे झाले आहे.

साहजिकच अशा बाबतीत त्या मुलांचे आयुष्य त्यांची मनःस्थिती व त्याचा एकूण जगण्यावर होणारा परिणाम याची कोणालाही फिकीर असल्याचे दिसत नाही. परीक्षा आणि त्यातून मिळणारे प्रमाणपत्र, हे मानवी जीवनाचे अस्तित्व होऊन गेले आहे. मात्र, केलेला अभ्यास वा ज्ञानार्जन याची कसोटी काहीही उरलेली नाही. प्रमाणपत्र कागद इतका निर्णायक झाला आहे की तेच विद्यार्थी जीवनाचे ध्येय उद्दिष्ट बनून गेले आहे. त्या कागदाने मुलांचे जीवन वा अस्तित्वच कस्पटासमान बनवून टाकले आहे. त्या कागदाने मुलांचे जीवन वा अस्तित्व कस्पटासमान बनवून त्यातून आत्महत्या होतात. नैराश्याने विद्यार्थी कोवळ्या वयात ग्रासले जातात. या नेहमीच्या समस्या होत्या, आता तर परीक्षा होणार किंवा नाही, ही नवी समस्या कोरोना विषाणूने आपल्याला बहाल केलेली आहे. परीक्षा व त्या घेण्याचे वा रद्द करण्याचे अधिकार, त्याविषयीची नियमावली कोट्यावधी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष जीवनापेक्षाही मौल्यवान होऊन गेलेली आहे. आधीच लॉकडाऊनच्या टाळेबंदीने मुलांची मने सैरभैर झालेली आहेत. आणि त्यातच निर्णायक परीक्षेची टांगलेली तलवार डोक्यावर कोसळून पडेल की नाही, ही विवंचना त्या मुलांना भेडसावते आहे, याचे निर्णय घेणाऱ्यांना थोडेतरी भान आहे का? असते तर इतके दिवस त्यावरून गोंधळ झाला नसता, किंवा विविध पदांवर बसलेल्या व्यक्तींनी आपल्या अधिकाराचे इतके थोतांड माजवून मुलांना असे अधिकच बैचेन करून टाकले नसते.

जी शिक्षण व्यवस्था एक सुविधा म्हणून उभारली, ती आता त्याच मुलांच्या जीवनाला जखडून टाकेल अशी गुलामीचा साखळदंड होऊन गेली आहे. त्या गुलामगिरीतून आपली मुक्तता कशी व कधी होणार, म्हणून आज करोडो मुले ग्रासलेली व निराश आहेत. मग ती शिक्षण व्यवस्थाच निरुपयोगी ठरलेली नाही काय? पण त्याचा विचारही तथाकथित धोरणकर्ते व कारभाऱ्यांना सुचत नाही. व्यवस्थेपेक्षा वा नियमापेक्षा माणूस मोलाचा असतो. कारण, सुविधा व नियमावली माणसाचे जीवन सुसह्य करण्यासाठी असतात. कुणाला हे सर्व आठवणार आहे का? कारण तीच समूह जीवनाची 'अग्निपरीक्षा' आहे.....




# शेतकरी

नको रे काही जास्त आम्हाला
पिकू दे जरा आमचं रान
होईल रे माझ्या बापाच्या
डोक्यावरचा थोडा कमी ताण...।।

राब राब राबतो बिचारा
गाडतो शेतीत बाप माझा घाम
दे ना रे कधीतरी त्याला
त्याच्या कष्टाचे दाम...।।

स्वार्थी नाही रे बाप माझा
या स्वार्थी जगासाठी जगतो
कधी पावसाची तर
त्याच्या मालाच्या योग्य भावाची वाट बघतो...।।

त्याच्या अंगातून घामाऐवजी
डोळ्यातून अश्रू पाहिले मी...
कोणाला दिसू नये म्हणून
भर पावसात माझ्या बापाला
रडताना पाहिले रे मी...।।

**– कु. स्मिता वसंत पाटील**
बी. एड्. २



# कोरोनाच्या छायेतील शिक्षण व्यवस्था

**सुवर्णा नामदेव शेळके**, बी. एड. भाग २

कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा विचार करून महाराष्ट्रातील १ ली ते ८ वी च्या वर्गात शिकवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. सद्यस्थिती पाहता हा निर्णय योग्य ठरतो. तिकडे CBSE ने देखील परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांना शाळेत यायला बंदी केली आहे. जिथे शक्य तिथे शिक्षकांनी ऑनलाईन पद्धतीने अध्यापन करावे असेही सूचित केले आहे. पण महाराष्ट्रातील शिक्षण प्रक्रिया मात्र पूर्णतः थांबवल्याचे चित्र दिसत आहे. कोरोनाचे हे संकट अजून किती काळ राहणार, हे कोणालाच माहीत नाही. कोरोनामुळे उद्‌भवलेली परिस्थिती येत्या जून महिन्यापर्यंत आटोक्यात आली नाही तर मात्र मुलांच्या शिक्षणाबाबत अधिक गांभिर्याने विचार करण्याची वेळ येईल. त्यामुळे भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शिक्षण खात्याने अल्प व दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांवर गांभीर्याने विचार करायला हवा. शिक्षणाबाबत असा विचार मांडणे काहीसे धाडसाचे वाटेल. पण पारंपरिक शिक्षण पद्धतीला तंत्रस्नेही अध्यापनाचा पर्याय देण्याची वेळ आता आली आहे. अशा विपरीत परिस्थितीत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरळीत राहावी, याकरिता तातडीने पावले उचलावी लागतील. संपूर्ण जगभरातील शिक्षण व्यवस्था आजच्या घडीला संक्रमणावस्थेतून जात आहे.

राज्यातील एकूण शिक्षकांपैकी केवळ २३ टक्के शिक्षक तंत्रस्नेही असल्याचे शिक्षण खात्याच्या अहवालात नमूद केले आहे. सर्व मुलांना ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी ही संख्या पुरेशी नाही. अशा परिस्थितीत शिक्षण खाते अल्प मुदतीचा प्रयत्न म्हणून एक कृती तातडीने करु शकतो. ती म्हणजे पाठ्यपुस्तकातील दफ कोडमध्ये डिजिटल कंटेंट अपलोड करणे. सन २०१५ पासून पाठ्यपुस्तकात दफ कोडच्या वापराला सुरुवात झालीय. पण अजूनही कित्येक इयत्तांच्या डिजिट आशय त्यात अपलोड केला नाही. मागील ५ वर्षात हे काम झाले असते तर आज लाखो मुलांना त्याा फायदा झाला असता. एफ कोडमध्ये व्हिडिओ किंवा चित्र रुपातील डिजिटल आशयापेक्षा कृतियुक्त आशयावर भर देणे गरजेचे आहे. यामुळे सद्यस्थितीत अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया पूर्णतः बंद न ठेवता कृतीद्वारे स्वतःच्या गतीने शिकण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होईल. या दफ कोडमधील कृतियुक्त आशयाला विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन पुढील आशयनिर्मितीच्या प्रक्रियेला वेग देता येईल. व्हर्च्युअल क्लासरूम, शिक्षणासाठी विशेष टी. व्ही. चॅनेल्स सुरु करण्याच्या घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत. मुंबई मनपाच्या शाळांमध्येदेखील काही वर्षापासून व्हर्च्युअल क्लासरूम सुरू आहेत. मात्र या सुविधा वापरण्यासाठी शाळेतच जावे लागते. घरी बसून मुलांना या व्हर्च्युअल क्लासमध्ये सहभागी होता येत नाही. त्यामुळे अशा व्हर्च्युअल क्लासरूमचा सरकारी शाळांमध्ये होणारा वापर लक्षात घेता ही तांत्रिक चूक कशी दुरुस्त करता येईल याचा विचार आताच करावा लागेल. यापेक्षा पाठ्यपुस्तकातील दफ कोडचा अधिकाधिक वापर करणे सोईचे आहे. महत्त्वाचे म्हणजे बालभारतीचे तज्ज्ञ अधिकारी हे काम घरी बसूनच करू शकतात. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांच्या व इतरांच्या जीवाला धोका न पोहोचता हे काम करता येईल.

लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढणे म्हणजे परीक्षा पुढे ढकलणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही. याची काळजी घेणे होय. कष्टकरी जनतेची मुले डोळ्यांसमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाज घटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याचे योजना केंद्र व राज्य सरकारी तातडीने करावी.

कोरोना विषाणूची साथ हे दुसऱ्या महायुद्धानंतरचे जगासमोरचे मोठे संकट आहे. मानवी जीवनाच्या सर्वच बाजूंवर या संकटाने प्रभाव टाकला आहे. या रोगाला अजून प्रतिजैविके न सापडल्यामुळे रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजने एवढाच आता सर्वांसमोर पर्याय आहे. म्हणून लॉकडाऊनचे धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा सर्व देशांत प्रयत्न चालू आहे. या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भीतीचे वातावरण पसरले आहे.

जागतिक सत्ता केंद्र युरोप-अमेरिका खंडाकडून आशिया खंडाकडे सरकत आहे. लॉकडाऊनमुळे येणाऱ्या सक्तीच्या रिकामेपणामुळे व एकटेपणामुळे कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. कोरोनाला रोखण्यासाठी अनेक देशांनी शिक्षणसंस्थासुद्धा बंद केल्या आहेत. युनेस्कोच्या अहवालानुसार एप्रिल २०२० मध्ये १८८ देशांत १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात १५ लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी आणि १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. ३० कोटी विद्यार्थ्यांनी रिकामेपणे घरी बसणे हा एक टाईमबॉम्ब आहे. सध्या कोरानाची स्थिती ही केवळ आरोग्याची समस्या आहे, असे मानले जात आहे. लोकांचे रिकामेपणा, एकटेपणा घालविण्यासाठी रामायण,

महाभारतासारख्या मालिका दूरदर्शनवर दाखवून भूतकाळातल्या आभासी जगात जनतेला रमवून, वर्तमानातील समस्यांवर मात करता येत नाही. युनेस्कोने शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या समस्येवर तातडीने मार्ग काढण्याच्या सूचना आपल्या सभासद देशांना दिल्या आहेत. शिक्षणात झालेल्या या व्यत्ययाने मुलांना शिक्षण हक्कापासून वंचित रहावे लागत आहे. असे मत युनेस्कोने नोंदविले आहे. दूरशिक्षण माहिती तंत्रज्ञानाचा वापर, यु. ट्युब, टॅगआऊट, मल्टि मिडिया, मोबाईल फोन इ. लायब्ररी, दूरदर्शन इ. माध्यमांतून अनेक देशांना तातडीने मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये म्हणून वरील प्रकारचे उपक्रम सुरु केले आहेत. भारतात मात्र परीक्षा रद्द करणे, परीक्षा पुढे ढकलणे, परीक्षा न घेता मुलांना पुढच्या वर्गात प्रवेश देणे. एवढ्यापुरतेच निर्णय घेतले जात आहेत. परिस्थितीची अनिश्चितता लक्षात घेतली, तर भारताने सुद्धा दीर्घकाळासाठी शैक्षणिक धोरण ठरविणे आवश्यक आहे. भारतात उच्च शिक्षणात व मेडिसीन, इंजिनिअरिंग, कॉमर्स व मॅनेजमेंट यासरख्या व्यावसायिक अभ्यासक्रमात माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या वरच्या स्तरातील असल्यामुळे लॅपटॉप, इंटरनेट इ. खर्च त्यांना परवडतो. त्यामुळे प्रामुख्याने अभिजन वर्गाच्या छोट्या गटांचा अभ्यास ऑनलाईन चालू आहे. हाच अनुभव शालेय शिक्षणातही आहे. ज्या उच्च मध्यमवर्गीयांची मुले, सर्व सोयींनीयुक्त अशा पंचतारांकित शाळेत जात आहेत. त्यांचेही ऑनलाईन शिक्षण चालू आहे. समस्या आहे, ती बहुसंख्य कष्टकरी, गरीब वर्गातील मुलांची, भटके–विमुक्त, आदिवासी, ग्रामीण भागातील सरकारी किंवा अनुदानित शाळेत जाणाऱ्या मुला–मुलींची माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा प्रसार, शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाची संधी वाढविण्यास भरपूर वाव आहे. ट्राय च्या अहवालानुसार भारतात २०२० मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ६८.४५ कोटी आहे. मोबाईल फोन वापरणाऱ्यांची संख्या ४८.८२ कोटी आहे. तर इंटरनेटसह स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या ४०.७२ कोटी आहे. तर टी.व्ही. पाहणाऱ्यांची संख्या ७६ कोटी आहे. हा माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार झालेला दिसत असला तरी त्यात प्रचंड विषमता आहे. भारतात ५२ टक्के जनता इंटरनेटचा वापर करणे म्हणजे निम्मा भारत इंटरनेटच्या लाभापासून वंचित आहे. ग्रामीण भागात ३६ टक्के जनता व शहरात ६४ टक्के जनता इंटरनेटचा वापर करते. तर ६७ टक्के पुरुष व ३८ टक्के स्त्रिया भारतात इंटरनेटचा वापर करतात. माहिती तंत्रज्ञान हे शहरी, सधनवर्ग व पुरुष यांचीच सध्या मक्तेदारी होत आहे. त्यामुळे नॅशनल डिजिटल लायब्ररी, स्वयंम, शोध गंगा इ. सरकारी प्रकल्पांचा फायदा मर्यादित होत आहे. या प्रकल्पाच्या ऑनलाईन शिक्षणात, कम्प्युटरची किंमत, इंटरनेटचा खर्च, विजेचा पुरवठा इ. प्रमुख अडचणी आहेत. त्यामुळे ऑनलाइन शिक्षण ही चैन शहरातील सधनवर्गाला परवडते. अनेक अप्रगत देशातसुद्धा अशीच परिस्थिती आहे. म्हणून त्या दशांनी टी.व्ही. माध्यमाचा वापर शाळा बंदच्या काळात जास्त करायला सुरुवात केली आहे. भारतात मात्र अशा कोणत्याही योजनेची साधी चर्चाही सुरु झालेली नाही. भारतात नऊशेहून अधिक चॅनेल्स आहेत व घरी बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी या चॅनेलचा वापर कसा करून घेता येईल, याबद्दल शिक्षण खात्याकडून काही पावले उचलली जाणे आवश्यक आहे.

५ एप्रिल रोजी मानवसंसाधन मंत्री पोखरिपाल यांनी असे आश्वासन दिले की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान या लॉकडाऊन काळात होणार नाही याची काळजी घेतली जाईल. पण, शैक्षणिक नुकसान म्हणजे परीक्षा पुढे ढकलणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही, याची काळजी घेणे होय. कष्टकरी जनतेची मुले डोळ्यासमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाजघटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याची योजना केंद्र व राज्य सरकारने तातडीने करावी.

# लोकगीत

बरी नव्हे थट्टा, बरी नव्हे थट्टा, बरी नव्हे थट्टा
भलभल्यास लाविल बट्टा, अशी ही थट्टा
  ब्रह्मदेव त्रैलोक्याला शोधी
  थट्टेने हरवली बुद्धी
  केली नारदाची नारदी
  अशी ही थट्टा
थट्टा दुर्योधनानं हो केली
पांचाली सभेत गांजिली
गदाघावे मांडी फोडिली
अशी ही थट्टा
  थट्टेने दुर्योधन मेला
  भस्मासुर भस्म की हो झाला
  अशी ही थट्टा
थट्टा रावणाने त्या केली
सोन्याची लंका बुडविली
थट्टा ज्याची त्यास भोवली
बरी नव्हे थट्टा

**– धनश्री दिलीप पाटील**
बी. एड्. २

# प्रारंभ होऊन कलीयुगाचा

**जाधव ऋतुजा जयसिंग**, बी. एड. भाग २

सतयुगाची नवी पहाट होतेय बग....
हे मानवा. Lockdown झालाय सारं
हे सर्व विश्वच अडकून पडलय बग....

ह्या अडकलेल्या विश्वात Lockdown च्या काळात शेजारीच एका मायलेकरांचा संवाद कानावर पडला....

मुलगा वय वर्षे १३-१४ असणारा आपल्या आईला ओरडत होता...

मुलगा : मम्मी.... तुझा मोबाईल कुठ आहे गं.....?

मम्मी : अरे पण तुला मोबाईल काय करायचाय...? वास्तविक तुला हवा कशाला...?

मुलगा : विसरलीस का तू....?

मम्मी : काय रे ..?

मुलगा : अग काल टिचरांनी फोन केला होता ना... आमचं Education online आहे म्हणून...

मम्मी : अरे हो...

मुलगा : अग आता ११ वाजता झुम ॲप वर Lecture आहे.

मम्मी : बर बाबा... मोबाईल चार्जिंग आहे. व्यवस्थित काढून घे.

मुलगा : हो गं.. माहितीय सर्व मला.

(मम्मी स्वतःशी पुटपुटते....)

आजकालची मुलं खूपच ॲडव्हान्स आहेत. आमच्यावेळी हे असं काही नव्हतं. आम्ही तर पुस्तक वाचूनच अभ्यास केलाय. देवा काय दिवस आलेत रे बाबा.....

असे उद्‌गार ऐकल्यावर जाणीव झाली. खरंच अडकून पडलय जग सारं अन कलीयुगाचा अंत दिसू लागलाय. सध्या सर्व परिस्थिती अतिशय भयानक आहे. जागतिक महामारी म्हणून घोषित झालेल्या covid-19 (corona) ह्या आजाराने रौद्र रूप धारण केले आहे. अशा परिस्थितीत अनेक अडचणींची जाणीव होते. अन त्यातील एक अडचण म्हणजे "शिक्षण".

मूलभूत गरजांपैकी एक गरज म्हणजे 'शिक्षण'. वाचन, मनन, चिंतन करून ध्यान प्राप्ती होते ह्या विधानाला दुजोरा देऊन एक वेगळी पद्धत जगानं अवलंबली आहे. आणि संवादामध्ये त्याच पद्धतीचा उल्लेख केला आहे. त्या संवादात online Education (E-learning) ह्या शिक्षणपद्धतीचा उल्लेख केला आहे. आता ऑनलाईन एज्युकेशन म्हणजे खूप विवेचन, सहमती, दुमती, मतभेद आहेतच. त्यातील काहीशी...

१) online Education म्हणजे मुलांना वाईट सवयी...?
२) mobile, Tab, Laptop यासारख्या साधनांचा अति वापर...?
३) online च्या माध्यमांतून social media चा गैरवापर...?
४) मैदानी खेळांची मर्यादा....?
५) वास्तविक जीवनातून मोहपाशात अडकतील....?

अशा एक ना अनेक शंकाकुशंका आपण थोडसं जाणून घेऊन online Education (E-learning)

E-learning म्हणजे Electronic म्हणजेच Internet च्या माध्यमातून online अभ्यास E-learning सर्व प्रकारच्या Electronic माध्यमांतून प्रदान करण्यात येऊ शकते. परिस्थितीनुसार प्रपत्रात व अध्यापन पद्धतीत, तज्ज्ञांच्या व जनमत प्रणालीतून बदल केलेली लवचिकता.

हा project पूर्णपणे online असल्यामुळे हा project राबविताना शिक्षकांजवळ project मध्ये दिलेल्या साधनांपैकी किमान दोन साधनांचा वापर केला जातो. संगणकाचे ज्ञान पूर्णपणे English, Java, binary system या भाषांमध्ये आहे. ते मराठीत रुपांतर करताना काही मर्यादा आहेत. त्यासाठी अभिप्राय प्रमाणे चुकांची दुरुस्ती करून तसा बदल केला जातो.

प्रकल्पामध्ये सर्व शासकीय नियमांचे पालन करून व शासनाच्या सर्व नियमांचे वाचन करून नियमबद्ध व सूत्रबद्ध नियोजन केले जाते. या project साठी किती साधने आवश्यक असतात.

१) सर्व शासकीय सेवेतील शिक्षकांचे E-mail
२) शिक्षकाजवळ संगणकाची उपलब्धता
३) pen drive
४) Android mobile

हे माझ्या पाहण्यात आलेल्या माहितीपैकी E-learning बद्दल थोडसं. आपण थोडसं काही प्रश्न जे उपस्थित झालेत त्यासंदर्भात थोडेसे पाहू.

तंत्रज्ञान शिक्षणाने जितके फायदे आहेत तितकेच भयावह दुष्परिणामही आहेत. काही तरुण वर्ग अशा तंत्रज्ञानाने गुन्हेगारी प्रवृत्ती आत्मसात करत आहे. त्यालाच cyber crime असं समजतात. त्यातून तरुण पिढीचे मानसिक स्वास्थ्यही धोक्यात आल्याचे दिसून येते.

मोबाईलचा अतिरेकी वापर हीच मोठी समस्या आहे. Online education ने मुलांमध्ये मोबाईलचा अतिरेकी वापर वाढत निघालाय आणि ती एक काळजीची बाब आहे. अभ्यासाच्या

नावाखाली मुलं online चा गैरवापर करत आहेत. काही संदेश पुढे पाठवून मुलं समाजमाध्यमांवरील लोकांमध्ये द्वेष, भीती पसरवणे व भावना दुखावणे अशी कृत्ये करीत आहेत.

अनेकवेळा online अभ्यासक्रमासाठी ज्या काही online Links पाठवल्या जातात. त्यातून आपल्या संगणकातील संवेदनशील माहिती दुसरीकडे प्रसारित होण्याची शक्यता असते. अन अशा धोक्यांची कल्पना त्या विद्यार्थ्यांना नसते. पालक वर्गाला सर्वात मोठ नुकसान होण्याची शक्यता म्हणजेच वास्तविक जीवनातून मुलं मोहपाश अशा दुनियेकडे ओढली जात आहेत. त्यातून मुलांमध्ये एकटेपणा अन नैराश्य पहावयास मिळतं. ह्या सर्वातून एकच जाणवतं की, अतिरेक वापर झाल्यास वाईट परिणामही आहेत. म्हणून online education हे काही खबरदाऱ्या घेऊन करणे अति महत्त्वाचे ठरेल.

असं काहीसं E-learning बद्दल थोडसं. काळाच्या ओघात अशा शिक्षणपद्धतीचा उदय होईल. परंतु त्या काळात तर तीच उपयुक्त ठरतेय. Lockdown मध्ये अशा पद्धतीने ज्ञानप्राप्ती करून सर्वांनी ह्या काळाचा आनंद घ्यावा हीच माफक अपेक्षा....

तुम्हा सर्वांकडून एकच अपेक्षा व्यक्त करेन,
।। अवचित आली महामारी कोरोनाची,
उमेद न हरता सोबत लढू.....
चल उठ मानवा नवी वाट काढू ।।
।। शिवभक्त, लढवय्या इतिहास आपुला,
लाचार होवून हिरमुसल्या डोळ्यांनी नको रडू...
चल उठ मानवा नवी वाट काढू ।।




# पहिली टेडी बेअर

## **सुतार असमा शहाबुद्दिन,** बी. एड. भाग २

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष थिओडोर(टेडी) रुसवेल्ट यांच्या नंतर टेडी बेअर ना हे नाव मिळाले. एकदा शिकारीला गेल्यानंतर राष्ट्राध्यक्षांनी छोट्या अस्वलाला गोळी घातली नाही. १६ नोव्हेंबर १९०२ च्या दै. वॉशिंग्टन पोस्ट मध्ये क्लिफर्ड के बेरिमन याने हा प्रसंग व्यंगचित्रातून सादर केला. न्यूयॉर्कमधील मॉरिस मिचटॉम या दुकानदाराने लगेच छोटी खेळण्यातील जाडजुड अस्वले बनवली व त्यांची टेडी बेअर अशी राष्ट्राध्यक्षाच्या परवानगीने जाहिरात करण्यास सरुवात केली. त्याच दरम्यान मार्गारेठ स्टीफ या जर्मन खेळणी बनविणाऱ्या स्त्रीने खेळण्यातील अस्वले बनवली व ती अमेरिकेत निर्यात केली. कारण त्यावेळी अमेरिकेत टेडी–व ती अमेरिकेत निर्यात केली. कारण त्यावेळी अमेरिकेत टेडी–बेअर ना मागणी प्रचंड वाढली होती. १९०३ मध्ये स्टीफच्या कारखान्यात १२,००० टेडी बेअर्स तयार झाली. १९०७ मध्ये हाच आकडा ९,७४,००० एवढा झाला. स्टीफची ही टेडी बेअर्स आजही आंतरराष्ट्रीय पातळीवर विकली जातात. त्यांच्या काळात असलेल्या विशिष्ट टॅगमुळे ती प्रसिद्ध आहेत.



# कोरोनाशी देऊ लढा, अर्थव्यवस्थेचा उभारू कणा

**सायली शंकरराव पाटील**, बी. एड. भाग २

या जगामध्ये मनुष्याने अनेक रोगांचा सामना केला आहे. पण आज संपूर्ण जगभरात अशा एका व्हायरसनं थैमान घातलंय की ज्यामुळे संपूर्ण दुनियेची झोप उडाली आहे. खरं तर या आधी आपलं आयुष्य खूप वेगळं होतं. आनंद, इच्छा, मजा आणि उत्साह या सगळ्या गोष्टींनी भरलेल्या एका वेगवान वाहनाने प्रवास करत असतानाच मध्ये आपल्या जीवनाच्या शब्दकोशात एक नवीन शब्द येऊन पडला तो म्हणजे 'कोरोना'. कोरोनामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले असून त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रात होताना दिसून येतोय. त्यातील चिंतेची बाब म्हणजे ढासळत चाललेली अर्थव्यवस्था. कोरोनाचा शेती, उद्योग, पर्यटन, वाहतूक, आरोग्य यावर परिणाम होऊन अर्थव्यवस्था ढासळत चालली आहे. ही फार मोठी चिंतेची बाब आहे. ढासळत चाललेली अर्थव्यवस्था उभा करणे आज काळाची गरज बनली आहे. म्हणूनच आज मंचाला विषय मिळाला– कोरानाशी देऊ लढा, अर्थव्यवस्थेचा उभारू कणा.

आला विषाणू कोठून सांगा ?
उत्तर देताय ना ? सांगा उत्तर देताय ना ? ?

अशी आज सर्वत्र जगभर चर्चा सुरू आहे. या विषाणूने जगात थैमान घातलेले आहे. खरं तर हा विषाणू नक्की आहे तरी काय असा प्रश्न उद्‌भवला आहे. कोरोना विषाणू हा एक असा विषाणू आहे जो आपल्याला डोळ्याने दिसू शकत नाही. हा एक अतिसूक्ष्म विषाणू आहे. ज्याला या आधी कधी पाहिलं गेलं नव्हतं. सर्वात प्रथम या विषाणूचा संसर्ग डिसेंबर २०१९ चीनमधील वुहान या शहरात आला. त्यानंतर या विषाणूचे नाव नोबल कोरोना व्हायरस ठेवण्यात आले. कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे ज्या रोगाची लागण होते त्या रोगाचे नाव 'covid-19' ठेवण्यात आले. असून हा विषाणू खूप घातक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेनुसार या विषाणूने संपूर्ण दुनियेतील अनेक लोकांना याची बाधा झाली आहे. आणि कित्येक लाखाहून अधिक लोकांना जीव गमवावा लागला आहे.

कोरोना विषाणू दिसत नसल्यामुळे हा रोग कोणाला झाला आहे हे समजणे खूप कठीण जाते. या रोगाची लक्षणे नक्की आहेत तरी काय ? 'covid-19' हा संसर्गजन्य रोग असून याची लागण झाल्यास ताप, सर्दी, कोरडा खोकला, डोकेदुखी, जुलाब, श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे, बोलता न येणे इत्यादी लक्षणे आढळून येतात. एखाद्या व्यक्तीला याची लागण झाल्यास त्याची लक्षणे दिसून येण्यासाठी सरासरी ५ ते ६ दिवस किंवा १४ दिवस देखील लागतात. गंभीर स्थितीमध्ये न्यूमोनिया तसेच फुफ्फुस, यकृत, घसा, हृदय, मेंदू असे शरीराचे अनेक अवयव निकामी होतात आणि मृत्यू होतो. 'covid-19' संसर्गजन्य असल्याने जर कोरोनाबाधित व्यक्ती एखाद्या ठिकाणी शिंकली तर त्या शिंकेतून बाहेर पडणाऱ्या थेंबांना कोणी स्पर्श केला तर यामधूनही या विषाणूची बाधा होते तसेच कोरोनाबाधित व्यक्तीच्या इतर कोणत्याही वस्तूला स्पर्श केला तर त्या व्यक्तीसही कोरोनाची बाधा होते.

या कोरोनाने संपूर्ण जग हैरावून गेलं.
मोठ्या लोकांचे मोठेपण विसरून गेलं
जेव्हा पुन्हा एकदा घर तयार झालं
तेव्हा कळत गेलं
कुटुंबावर प्रेम करणं तर राहुनच गेलं
कोरोना तू आला लोकांचे जीव घ्यायला
म्हणून आम्ही सामोरे गेलो लॉकडाऊनला
लॉकडाऊनमुळे का होईना सारं जग बंद झालं

खरंच, या कोरोनामुळे संपूर्ण जग बंद पडलं आहे. त्याचं जीवंत उदाहरण म्हणजे २१ मार्च २०२० चा पहिला लॉकडाऊन आणि त्यामध्ये होत चाललेली वाढ कोरोनाचा प्रसार कमी होण्यासाठी लॉकडाऊन केलं पण तरीदेखील रोग्यांची संख्या वाढतच चालली. अमेरिका, इटलीसारखे आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टीने सक्षम असणारे देश सुद्‌धा हतबल झाले. मग आपला नंबर कुठे? गणितीय पद्धतीने विचार करता हा रोग देशात पसरला तर इटलीसारखी अवस्था व्हायला वेळ लागणार नाही. कोरोनामुळे शेती, उद्योग, पर्यटन, वाहतूक, आरोग्य, बेरोजगारी या सर्व अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या घटकांवर परिणाम होत चाललेला दिसून येतोय. त्यामुळे अर्थव्यवस्था ढासळताना दिसून येते.

खरं तर, शेती आणि पूरक व्यवसाय हा आजही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीवर उदरनिर्वाहसाधन म्हणून अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण देशात ६० टक्के आहे. त्यांची संख्या ७०० दशलक्ष होते. तसेच ६० टक्क्यांपेक्षा अधिक लोक देशात ग्रामीण भागात राहत आहेत. शेती आणि पूरक व्यवसायच आज तरी उदरनिर्वाहाचे साधन आहे. शेतीतून निर्माण होणाऱ्या रोजगारावरच या लोकांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. कारण शेतीपूरक व्यवसायांचा विकास मर्यादितच होत आहे. शेतीचे वृद्‌धीतील योगदान मात्र अल्प म्हणजेच १६.५ टक्के पर्यंत असून ते सातत्याने घटत आहे. त्यामुळे सरकारचे आर्थिक पॅकेज शेतीचे

पुरुज्जीवन करू शकेल का?

दाणे पेरुनि उगवितो सोने,
तरी हे कसले दरिद्री जीणे,
अंधार झोपडीत अन जीवनात
नाहीच का प्रकाशाचे माझ्या दारी येणे.

अगोदर दुष्काळ नंतर महापूर आणि आता हा कोरोना. त्यामुळे शेतकरी मात्र आहे. तेच जीवन जगत आहे. या कवितेच्या उक्तीप्रमाणे त्याचे जगणे चालूच आहे. टाळेबंदीचा परिणाम शेतीवर कसा झाला आहे याचा थोडक्यात आढावा.

कोरोनाचा शेती आणि शेतीपूरक व्यवसायावर सखोल आणि व्यापक परिणाम झाला आहे. एकूण शेतमजुरांपैकी ५४.९ टक्के भूमिहीन तर ४५.१ टक्के अल्पभूधारक आहेत. ४०० दशलक्ष लोकांना टाळेबंदीचा फटका बसला आहे. रोजगार बंद झाल्याने कामगारांची शेतीमालाला मागणी कमी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. २०१८-१९ मध्ये शेतीमाल निर्यातीपासून ३८ अब्ज मिळाले होते. ते सोडून द्यावे लागले. बाजारपेठ बंद, वाहतूक सुविधांचा अभाव यामुळे मुंबई, पुणे, दिल्ली सारख्या शहरात होणारा शेतीमालाचा उठाव झाला नाही. आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

खेड, पिंपळगाव, पुणे येथील शेतकरी दौंडकर यांच्या मते, फ्लॉवर, कोबीपासून दर एकरी ४०,००० प्रमाणे दोन एकरांचे ८०,००० रुपयांचे नुकसान झाले. पश्चिम बंगाल मधील झारग्राम, सुंदरबन परिसरात अन्नधान्याची टंचाई जाणवत आहे. एकूण हपूस आंब्याच्या उत्पन्नापैकी ५५ टक्के महाराष्ट्रात होते. आणि त्यातही मुंबई, पुणे आणि कोल्हापूर ही मोठी बाजारपेठ आहे. मात्र या बाजारपेठा बंद असल्याने मागणी घटल्याने उत्पादकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. माजी शेती सचिव सिराज हुसैन म्हणतात- पंजाब, हरियानातून गहू सरकारने खरेदी केला. मात्र तो बिहारमधुन झाला नाही. मक्याची आधारभूत किंमत १७६० रुपये प्रतिक्विंटल असताना ११०० रुपयांना विकावा लागला. मध्यप्रदेशात उठाव नसल्याने चण्याला प्रतिक्विंटल ६०० ते ७०० रुपये कमी मिळाले.

कोरोनाच्या महामारीचा परिणाम भारतीय उद्योगांवर देखील झाला आहे. कापूस उद्योग, औषध निर्मिती तसेच अनेक लहान मोठे उद्योग ठप्प झाले आहेत. कोरोनाचा परिणाम भारतीय कापूस उद्योगावर झाला आहे. निर्यात घटल्याने या उद्योगात मंदीचे वातावरण आहे. आखाती देशातील चीन, बांग्लादेश, पाकिस्तान, इंडोनेशिया या देशात भारतीय कापसाची निर्यात होत असते. कोरोना व्हायरसमुळे तेथेही निर्यात घटली आहे. त्यामुळे कापसाच्या भारतीय बाजारपेठेला धक्का पोहोचला आहे. त्याचप्रमाणे या उद्योगावर अवलंबून असणाऱ्या मजुरांना फटका बसून बेरोजगारी वाढत आहे. त्याचप्रमाणे औषधांच्या निर्मितीसाठी देखील भारत चीनवर अवलंबून आहे. आणि या औषधांच्या निर्मितीसाठी चीनमधून ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इनग्रेडियंटस् (API) आयात केली जातात. औषध निर्मितीचा हा कच्चा माल असतो. कोरोना व्हायरसमुळे मोठा परिणाम आयात आणि निर्यातीवर झाला आणि API आयात होऊ न शकल्याने अनेक कंपन्यांचं उत्पादन घटतंय. API चा पुरवठा दीर्घ काळ बंद राहिला तर भारतासोबत जगभरात औषधांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. या उद्योगांबरोबरच लहान सहान सर्व उद्योगावर परिणाम होऊन त्याचा फटका अर्थव्यवस्थेला बसला आहे.

आपला देश हा विविध सौंदर्यसृष्टीने नटलेला देश आहे. देशात अनेक पर्यटन स्थळे आहेत. जेथे दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. कोरोना विषाणूच्या संसर्गाचा धसका पर्यटकांनी घेतला असल्याने आंतरराष्ट्रीयच नव्हे तर राष्ट्रीय पर्यटनावर देखील परिणाम झाला आहे. एप्रिल व मे महिन्याच्या सुट्ट्यांमध्ये फिरायला जाता यावा म्हणून जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात पर्यटक पर्यटनासाठी आपल्या आवडीनुसार आगाऊ आरक्षण करीत असतात. मात्र सध्या केलेले आरक्षण रद्द करीत आहेत. त्यामुळे थंड हवेची ठिकाणे, अजंठा-वेरुळ, जम्मू-काश्मिर यासारखी सर्व पर्यटनस्थळे ओसाड दिसून येत आहेत. पर्यटन व्यवसायात जवळजवळ ८६ टक्के घसरण झाली आहे. त्याचा परिणाम आपोआप भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला आहे.

साबणाने हात स्वच्छ धुवा
विनाकारण प्रवास टाळा
कोरोना म्हणेल
चला इथून पळा
सर्दी, खोकला, पडसे येता
मास्क, रुमाल वापरा
धाडसी धीट बनवा
मनाचा प्रत्येक कोपरा
गर्दी करू नका
रस्त्यावर नका खोकू
कोरोनाला मुळासकट
उखडून फेकू.
प्रतिकारशक्ती वाढवू.
निर्व्यसनी राहू
विनाकारण नका करू
कोरोनाचा बाऊ.
दैदीप्यमान परंपरा
शत्रू परतवला आम्ही

कोरोनाही परतवू, हीच देऊ हमी.

अशी सध्या आपल्या सरकारने कोरोनासाठी भूमिका घेतली आहे. खरंच, कोरोना विषाणूचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या सर्व घटकांवर झाला असला तरी देखील आपले सरकार अर्थव्यवस्था पुन्हा उभा करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करीत आहे. शासनाने अर्थव्यवस्था पुन्हा उभी करण्यासाठी काही अर्थिक पॅकेजेससुद्धा दिली आहेत. शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना भरारी आणण्यासाठी आर्थिक पॅकेजमध्ये काही तरतूदी केल्या आहेत. भात क्षेत्रातील शीतगृहे साठवण गृहे, अन्नप्रक्रिया उद्योग, सहकारी संस्थांमधील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी १ लाख कोटी रुपयांची तरतुद केली आहे. पशुरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी १३.३४३ कोटी रुपयांची तरतुद केली आहे. पशु पालन पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी १५ हजार कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. मधुमख्खिपालनासाठी ५०० कोटी रुपये तरतूद केली आहे. औषध वनस्पती लागवडीसाठी ४ हजार कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

लघु अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी १० हजार कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. मासे, संपदा विकासासाठी २० हजार कोटी रुपये राखुन ठेवले असून मासे उत्पादन आणि रोजगार वाढविण्याचा सरकारचा मानस आहे. अशा प्रकारे कृषी पूरक उद्योगांना उत्तेजन देण्यासाठी एकूण १,६३,३४३ कोटी रुपयांचे पॅकेज जाहिर केले आहे. जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ दुरुस्त करून तृणधान्ये, कडधान्ये, कांदे, बटाटा, खाद्यतेल, तेलबिया नियंत्रण मुक्त केल्या जाणार आहेत. शेती माल विक्रीत सुलभता आण्यासाठी केंद्रिय कायदा आणला जाणार आहे. शेतकऱ्याला आर्थिक उत्पन्नाची हमी देणारी कायदेशीर यंत्रणा तयार केली जाणार आहे. बाजारपेठा, उद्योगदेखील आता खुले करण्यात येणार आहे.

कृषी बरोबरच उद्योग, पर्यटन, वाहतुक, शाळा सुद्धा टप्प्याटप्याने सुरू करण्यात येणार आहे. खरं तर कोरोना हा घरी बसून संपणार नाही. त्याला गर्दीत चेंगरून मारले पाहिजे. अशी भूमिका घेवून सध्या लॉकडाऊन शिथिल करण्यात येत आहे. उद्योग, पर्यटन, शाळादेखील पूर्ववत होत आहेत. लॉकडाऊन उठवल्यानंतर सुद्धा सर्व नागरिकांनी सुरक्षित अंतर ठेवून स्वतःचे व सार्वजनिक स्वाथ्य जपले पाहिजे. डॉक्टर्स, नर्स, पोलिस, सफाई कर्मचारी आपले प्राण पणाला लावून कोरोनाशी लढत आहेत. त्यांचा सन्मान केला पाहिजे. लॉकडाऊन उठल्यानंतर आपले वर्तन कसे असावे यावर एक छोटीशी कविता अवर्जुन नमूद करावीशी वाटते.

एक दिन कोरोना चला जाएगा
ध्यान रहे दाग ये आपकी इकॉनॉमी पे छोड जाएगा
बस एक छोटासा काम हम सभी को करना होगा
देश के नाम कुछ समय देना होगा
देश में रहना, देश में खाना और देशमें घुमना होगा
अपनी अर्थव्यवस्थाको आगे आकर अब हमें ही बचाना होगा
इंटरनॅशनल ब्रँड को छोडकर स्वदेशी को आपनाना होगा
देश में घुमनेकी बहुत सी हसीन वादीया है दोस्तो
विदेश छोड भारत में बच्चों को घुमाना होगा
देश की अर्थव्यवस्था को अब हमें ही उठाना होगा
लोकल दुकानदार से किराणा,
कपडे और दवाई आदि लेने होंगे
भारत को फिर आगे करने को
खुद भारत वासीयों को ही आना होगा।

माझ्या मते कोराना जाईल न जाईल हा विचार करणं सोडून आता त्याला बरोबर घेऊन चालायला शिकलं पाहिजे. त्यावर पाच महिने झाले असून अजुन लस तयार झाली नाही. लस निघेल न निघेल आपण सर्व नियम पाळून सुरक्षित अंतर ठेवून मास्क, सॅनिटायझरचा वापर करून कोरोनाला हरवण्यासाठी घराबाहेर पडलंच पाहिजे. डॉक्टर, नर्स, सफाई कर्मचारी, पोलीस तसेच जे या युद्धाचा सामना करतायंत त्यांचा सन्मान केला पाहिजे. कोणावर टिका न करता सर्वांनी एकत्र येऊन लढण्याची ही वेळ आहे. याचे भान ठेवून शर्तीचे प्रयत्न केले पाहिजेत. शेवटी जाताजाता एवढेच म्हणावेसे वाटतं.

हम होंगे कामयाब
हम होंगे कामयाब एक दिन
हां.... मन में है विश्वास
पूरा है विश्वास
हम होंगे कामयाब एक दिन !



# ◆ समाजशास्त्र विभाग ◆

❊ विज्ञान विभाग प्रमुख ❊

**प्रभारी प्राचार्य डॉ. बाबुराव मल्हारी पाटील**

ध्येयासाठी अतोनात प्रयत्न करा
जगाने तुम्हाला वेडे म्हटले तरी चालेल
कारण वेडेच लोकं इतिहास घडवतात
आणि शिकलेली लोकं तो इतिहास वाचतात....

लक्षात ठेवा
तलवारीच्या धारेपेक्षा
लेखणीची धार कायम टिकणार आहे आणि
सर्वात खतरनाक शस्त्र आहे.
म्हणून तलवार हातात न घेता
लेखणी हातात घेऊन
अन्यायावार मात करा.....

# डॉ. बापूजी साळुंखे : एक थोर शिक्षण तज्ज्ञ

**शिंदे पूनम गुणवंत**, बी. एड. भाग २



भारत म्हणजे नररत्नांची खाण. तपस्व्यांची तपोभूमी. कर्मयोग्यांची कर्मभूमी. पण अगदी थोडीच माणसे तपस्वी, कर्मयोगी अथवा नवरत्ने होतात. सर्व कार्यक्षेत्रात शिक्षण क्षेत्र हे अग्रगण्य आहे. शिक्षणाच्या भक्कम आणि मजबूत पायावरचं मानवाच्या यशाचे भव्य मंदिर उभे राहते. आधुनिक काळात शिक्षणाच्या ज्ञानयज्ञात महाराष्ट्रातील अनेक शिक्षणप्रेमी व समाज सुधारक धुरंधरांनी आपले सर्वस्व अर्पण केले आहे. त्यातीलच एक नररत्न म्हणजे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे.

महाराष्ट्रातील पाटण तालुक्यातील रामापूर गावी एका प्रतिष्ठित घराण्यात ९ जून १९१९ रोजी बापूजींचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नाव गोविंद ज्ञानोजीराव साळुंखे असे होते. बापूजींचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. रामपूरसारख्या छोट्या खेड्यात, परिस्थितीच्या कोड्यात सापडलेल्या गोविंदाने बापूजींपर्यंत घेतलेली झेप म्हणजे एक सुंदर आलेख आहे. आई लहानपणी वारलेली, वडिलांचे छत्रही हरवलेले आणि परिस्थितीच्या दशावतारात सापडलेले हे छोटे मूल एवढा भीमपराक्रम करू शकेल हे पाहिले म्हणजे आपले मन आश्चर्याने थक्क होते.

संस्कृत व मराठी हे बापूजींचे आवडते विषय होते. त्यांनी संस्कृतची धामणस्कर शिष्यवृत्ती पटकवली होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण इस्लामपूरला झाले. कोल्हापूर येथील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. ते सन १९४५ मध्ये बी.ए. व सन १९४९ मध्ये बी.टी. झाले.

पूज्य बापूजींचे जीवन शिक्षण व संस्कार यातूनच त्यांचे सामजिक राष्ट्रीय व शैक्षणिक कार्य साकारले आहे. बापूजींनी आपल्या विद्यार्थी दशेतच रोविली. शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार व प्रथम कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांचे ते लोकप्रिय विद्यार्थी होते. त्यांच्या आदेशावरून त्यांनी सोंडूर येथील घोरपडे राजघराण्याच्या इतिहाससंबंधी कागदपत्रांचे संशोधन केले. या संशोधनाबरोबरच सोंडूरचे महाराज यशवंतराव घोरपडे यांनी आपल्या पुत्रांना शिक्षण देण्यासाठी बापूजींची राजगुरु म्हणून नियुक्ती केली. हे काम त्यांनी दोन वर्षे केले.

सोंडूरला राजगुरु म्हणून ज्ञानदानाचे कार्य करीत असतानाच महात्मा गांधींच्या १९४२ च्या क्रांती लढ्यात बापूजींनी उडी घेतली. सातारा, सांगली व बेळगाव जिल्ह्यातील आंदोलनात काम केले. शिवाय स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन सातारा जिल्ह्यातील क्रांतीवीरांचा वस्तुनिष्ठ व उद्बोधक असा इतिहास लिहिला. बापूजी सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसचे प्रमुख होते. काँग्रेसमध्ये असतानाच ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील समितीचे अध्यक्ष झाले. हा गौरव निधी गोळा करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांना सातारा येथील महाराजा सयाजीराव महाविद्यालयातून शिक्षक म्हणून नेमले. बापूजी हाडाचे शिक्षक होते. शिक्षक खऱ्या अर्थाने देशाचा आधारस्तंभ असतो. जनसामान्यांचा मार्गदर्शक असतो याची जाणीव बापूजींना होती.

अन्नासाठी दाही दिशा आम्हा फिरवीशी जगदीशा ही झाली. सामान्य माणसांची जीवनपद्धती कामासाठी दाही दिशा आम्हा फिरवीशी जगदीशा ही महामानवांची रीत. तत्वाशी तडजोड तर अशा व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत स्विकारत नाहीत. म्हणूनच रयत शिक्षणसंस्था १९५५ रोजी सोडली. १९४५ ते १९५५ असे कष्टाने घडविलेले शिक्षण समाजसेवेचे जीवनाचे सोनेरी पान कर्मवीर अण्णांच्या समाजाच्या चरणावर समर्पित केले. साताऱच्या कोटेश्वराला कोटी कोटी प्रणाम करून करवीर निवासिनी महालक्ष्मीच्या आशिर्वादासाठी बापूजी निघाले.

तो काळ असा होता की लोक अशिक्षित होते. अंधश्रद्धा, हालअपेष्टा अशा अनेक समस्यांनी ग्रासलेले होते. सर्व सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचत नव्हत्या. त्यांना जर शिक्षित बनवायचे असेल तर शिक्षण हा एक मार्ग लक्षात घेऊन समाज अंधश्रद्धेपासून दूर करण्यासाठी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. कृष्णा कोयनेच्या पावन संगमावर कराड येथील योगेश्वर मुरलीधराच्या मंदिरात आपल्या मित्रांसोबत नवीन शिक्षणसंस्था स्थापण्याचा निर्णय घेतला.

बापूजी जसे धार्मिक वृत्तीचे तसेच सदाचारी, सदाविचारी

महानुभाव साहजिकच बापूजींच्या मनात संस्थेस संत शिक्षण संस्था अथवा भागवत शिक्षण संस्था असे नाव द्यावे वाटत होते. परंतु चर्चेच्या वेळी स्वामी रामानंद भारती यांनी मानवतेचे महान प्रतिक स्वामी विवेकानंद यांचे नाव सुचविले आणि यांनी नव्या शिक्षण संस्थेचे नाव श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था असे झाले.

बापूजींचे शिक्षण कोल्हापूरातच झाल्याने कोल्हापूर त्यांना जवळचे व जिव्हाळ्याचे होते. या वैभव संपन्न लक्ष्मी नगरीत, सरस्वतीनगरी निर्माण करण्याची जिद्द बाळगून आलेल्या बापूजींना सुरुवातीला अतिशय कष्ट करावे लागले. प्रथम पैशाचा प्रश्न उभा राहिला. स्वतः जवळचे कष्टाचे पैसे प्रथम देवून प्रथम श्रीगणेश सरस्वतीची पजा बापूजींनी मोठ्या मनोभावे केली. संस्थेचा कल्पवृक्ष तरारू भरारू लागला. आश्रमशाळा निघत होत्या. वसतिगृहे स्थापन होत होती. दशका दशकांनी माध्यमिक शाळांचा प्रपंच वाढत होता. महाविद्यालये निर्माण व्हावीत अशी तळमळ त्यांना लागली होती. अशीच एकदा मराठवाड्याने त्यांना हाक दिली. केवळ माध्यमिक शाळाच नव्हे तर संस्थेचे पहिले महाविद्यालय बापूजींनी तेथे काढावयाचे ठरविले व अल्पावधीतच रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद येथे सुरुही केले. शेतकरी कामकऱ्यांच्या मुलांना दलितांच्या मुलांना त्यांनी चालते बोलते केले. मातीच्या पुत्रांना सरस्वतीपुत्र बनविले. शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य केले. यामुळे बहुजन समाजातील तरुणात नवचैतन्याचे वारे वाहू लागले. त्यांच्यात स्वाभिमान व आत्मविश्वास याच काळात निर्माण झाला.

शिक्षणाला एक व्रत म्हणून बापूजींनी मानले. शिक्षणात संस्काराला असलेले महत्त्व त्यांनी ओळखले. केवळ ज्ञान आणि विज्ञान यांनीच समाज सुख, समृद्धी व अंतिम आनंदाकडे जाणार नाही. तर त्याला सुसंस्काराची जोड आवश्यक आहे. हे त्यांनी आग्रहाने व आवर्जून सांगितले. म्हणूनच त्यांनी 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' हे संस्थेचे ध्येयवाक्य निवडले. हे ब्रीद वाक्य म्हणजे बापूजींच्या आदर्श चारित्र्याचे आणि सुसंस्कृत मनाचे प्रतिक आहे. सुसंस्कार म्हणजे मानवी आत्मा, त्यामुळे हा आत्मा सुसंस्कारी होण्यासाठी शिक्षणप्रसाराची आवश्यकता असते. चांगल्या गोष्टींची ज्ञानप्राप्ती म्हणजेच सुसंस्कार, बापूजींनी तयार केलेल्या या ध्येय वाक्यावरून त्यांची दूरदृष्टी आणि एकविसाव्या शतकाकडील झेप लक्षात आल्यावाचून राहत नाही.

बापूजीचे शैक्षणिक विचार या संस्थेच्या बोध चिन्हामध्येच आहेत. संस्थेच्या बोधचिन्हामध्ये पाणी, कमळ, ज्योत, प्रकाश व ॐ आहे. पाणी म्हणजेच जीवन, त्यांचे तरंग म्हणजेच हृदयशीलता आहे. कमळ भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे. कमळ हे निर्मळ जीवन या अर्थी वापरले आहे. कमळातील पाकळ्यावर शिक्षण हा शब्द आहे. पणती, ज्योत व प्रकाश ही ज्ञानाची प्रतिके आहेत. ज्योतीने ज्योत पेटवावी व विद्येचा प्रसार करावा ही अपेक्षा व्यक्त केली आहे. पाकळ्यांवर दोन पणत्या आहेत. पण त्यांच्या ज्योतीवर ज्ञान, विज्ञान म्हणजे शिक्षण. ज्योतीच्या प्रभेतून ईश्वर पाचच अक्षरांची निर्मिती आहे. सुसंस्काराची प्रभा आहे. तेथे ईश्वर दर्शन होणारच !

बापूजींचे जीवन म्हणजे संत महात्मे यांच्या प्रभावी जीवनाचं प्रतिकच होत. मानवी जीवनात प्रार्थनेला अनन्य साधारण महत्व आहे. परिस्थितीने पिचलेल्या दादिद्र्याने गांजलेल्यांचे प्रबोधन केले. अनेक हालअपेष्टा सहन करून आदिवासी मुलामुलींसाठी आश्रमशाळा काढल्या.

असे गर्जुनी विद्या शिकण्या जागे होऊनी झटा,
परंपरेच्या बेड्या तोडूनी शिकण्यासाठी उठा.

हे शिक्षणमहर्षींचे महान व विधायक शिक्षण कार्य विचारात घेऊन शिवाजी विद्यापीठाने बापूजींना Doctor of letters ही सन्मानीय पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासाच्या वाटचालीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने मोलाची कामगिरी बजावली आहे. डोंगराळ ग्रामीण मागासलेल्या भागात शिक्षणाची गंगा पोहचविण्याचे कार्य शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले आहे. आज हे थोर महापुरुष आपल्यात नाहीत. तरीदेखील त्यांच्या कृती–उक्तीचा, स्मृती–स्फूर्तीचा गंध सदैव महाराष्ट्रात दरवळत आहे.

अशा या महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित असलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये महाविद्यालयात शिक्षण घेण्याचे भाग्य मला लाभले. माध्यमिक स्तर ते उच्च स्तरीय शिक्षण संस्थेत घेता येते. इथून पुढे डॉ. बापूजींचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून मी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात नक्कीच काहीतरी चांगले कार्य करीन....

अशा या थोर आत्म्यास मी शतशः वंदन करते.



# २०२० चा प्रलय...

**राडे कोमल राजाराम,** बी. एड. भाग २

सुखी जीवनाची वाट पाहता
काळ अलगद निघून गेला
माणसाची स्वप्ने वेचून
महापूर मागे परतला....

अजूनही अंगावर शहारा येतो तेव्हा मागच्या वर्षाची पूरस्थिती डोळ्यासमोर येते. अगदी जवळून पाहिलेलं ते दृश्य अलगद मनाच्या कोपऱ्यात घर करून गेलं. का कुणास ठाऊक नदीमायेने इतकं अक्राळविक्राळ रूप धारण केलं होतं. महाभयंकर असं वास्तव मागच्या वर्षी नदीकाठच्या माणसांना अनुभवण्यास आलं नदीमाय आली अन् होती. अन् होतं नव्हतं तेवढ सारं काही आपल्या कुशीत घेऊन गेली. अजूनही हातात आलेलं पिक गेलं म्हणून ढसाढसा रडणारा बाप आठवतो. आणि गावाबाहेर राहुन घराची काळजी करणारी माय आठवते. नव्याने उभारलेला संसार आणि त्याबरोबर जोडलेली स्वप्नं सगळं धुऊन गेलं.

सुरुवातीला पाणी पुलावर आलं म्हणून हौसेने बघायला गेलेलो आम्ही परंतु जेव्हा पाणी घरात येऊन थांबलं तेव्हा मात्र पायाखालची जमीन सरकायची वेळ आली होती. उंचावर जाऊन पाहिलं तेव्हा बघेल तिकडे फक्त पाणीच. जणू समुद्रच किनारपट्टी सोडून सांगली, सातारा आणि कोल्हापूरकडे आला की काय असं वाटायची वेळ आली होती.

पण यात निसर्गाचा तरी काय दोष? निसर्गाने सुद्धा 'जशास तसे' असेच उत्तर दिले होते. मानवाने निसर्गाचा गैरफायदा घेतला. प्रदूषणे केली त्याचंच हे उलट उत्तर होतं. जंगलतोड, धुराडे, कारखान्याच्या नाल्यातून जाणारी रसायने आणखी काही बरंच असं जे महापुराला कारणीभूत होतं. त्यामुळे निसर्गाचाच समतोल बिघडला आणि ही परिस्थिती ओढावली. गावाच्या कोपऱ्याकोपऱ्यात पाणी आलं. नदीतली घाण दारात आणि घरातलं सामान नदीमध्ये बघायला मिळालं.

ब्रह्मनाळ मध्ये तर एकदम १४ जणांचा मृत्यू बोट पलटल्याने झाला. काळजाला चिर जावी तसं झालं. जेव्हा त्या लहानग्या मुलाचे डोळे मिटलेले पाहिले. कितीतरी जनावरे वाहून गेली. माणूस कशीतरी धडपड करेल पण जनावरांच काय? समोर काळ उभा राहिला होता. पण एक पहायला मिळालं जाती जाती वरून भांडणारे लोकं जेव्हा एकाच हॉलमध्ये जीव मुठीत घेऊन बसली होती. नखरे करणारे मुकाटपणे मिळेल ते खात होते. आणि महागडे कपडे वापरणारा सुद्धा २ आठवडे २ जोडी कपड्यावर होता. ज्याला शक्य होत तो आपापल्या नातेवाईकांकडे गेला आणि सतत घराची काळजी करत राहिला. एकमेकांना मदतीचा हात पुढे केला. प्रत्येकाने स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला. कसली जागा, कोण माणसे, कसले जेवण काही शहानिशा केली नाही. मिळेल ते खाल्लं आणि बसेल तिथे झोपी गेला. एक आठवडा गावात कुणी पाऊल ठेवलं नव्हतं. गावात जिकडे तिकडे पाणीच पाणी फक्त दिसत होतं. अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी गावकरी धडपडत होते. रोज होड्या गावात फिरून कोणी राहिलंय का पहात होत्या. दुःख तेव्हा वाटलं जेव्हा या गंभीर परिस्थितीत सुद्धा राजकारण्यांनी राजकारण सोडलं नाही. जेव्हा मदतीचा हात हवा होता तेव्हा यांच्या डोक्यात राजकारण शिजत होतं. हेलिकॅप्टरमध्ये बसून आकाशातून वाऱ्या चालल्या होत्या. एकीकडे गाव सारं रिकामं झालेलं आणि पाऊस थांबायचं नावच घेत नव्हता. सगळं कसं अगदी सुन्न झालं होतं.

पुराच्या वेळी मात्र माणसातला देव पहायला मिळाला. जेव्हा जगभरातून नदीकाठच्या लोकांना वेगवेगळ्या प्रकारची मदत मिळाली. कुणी कपडे दिली, सामान दिलं, पैशाचीही मदत मिळाली. आणि सर्वकाही पूर्ववत होऊ लागलं. पडलेल्या भिंती, गेलेली पिकं आज पुन्हा जोमाने उभी आहेत. जगभरातून आलेल्या मदतीमुळे आज शेतकरी राजा नव्या उमेदीने वाटचाल करू लागला आहे. घरची माय जुन्या आठवणी विसरून नव्याने संसार करायला शिकली. लहान मुलं वाहून गेलेल्या दप्तरातील सामान पुन्हा दप्तरात भरू लागली. व्यावसायिक आजही आपला व्यवसाय सुंदरपणे करीत आहेत. जरी सगळं पहिल्यासारखे झालेले असले तरीही ती आठवण आहे अजून.

नदी, नदी म्हणत नदीचा झाला समुद्र
हे कधी कळालंच नाही,
नदी मायच्या क्रोधाने
ओसंडल्या दिशा दाही......
खाण्यापिण्याचं सोडाच पण
राहण्याची ही झाली कठिणाई
पात्राबाहेर पडली अन
सगळंच घेऊन कृष्णामाई....
दुःखाने त्या न खचता
उभा आहे माझा बाप बाई
मोडलेल्या संसाराची
घडी घालत आहे माझी आई........

# गुरु-शिष्य : एक अद्भुत नातं

**मोरे तेजस्विनी**, बी. एड. भाग २

हिंदूधर्म संस्कृतीतील एक परमोच्च स्थान म्हणजे आई, वडील आणि गुरु. ज्यामध्ये आईवडील आपल्याला जन्म देणारे असतात व तो जन्म या पृथ्वीतलावर सार्थकी ठरवणारे आपले गुरु असतात. भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून गुरुंना खूप महत्त्व आहे आणि ते असायलाच पाहिजे यात काही गैर नाही. गुरुंना आयुष्यामध्ये काय द्यायचं असतं व शिष्याकडून काय अपेक्षित असतं याचा गुणाकार म्हणजे आपलं शैक्षणिक जीवन आणि त्यानंतरचं त्याला अनुसरून असणारं आपलं आयुष्य....!

प्राचीन काळापासून म्हणजेच वैदिक काळापासून 'गुरुंची थोरवी' अनन्यसाधारण आहे. सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद, अरण्यके आणि अनेक प्राचीन धर्मग्रंथांमध्ये गुरुला धर्मस्थानी मानलेलं आहे. रामायण व महाभारतमध्ये तर गुरुशिष्यांच्या जोड्या आपल्याला खूप गोष्टी शिकवून जातात. खरेतर गुरु मिळणं ही गोष्ट खूप नशिबवान समजली जायची.

सध्याच्या शैक्षणिक पद्धतीमध्ये गुरुशिष्याचं नातं हे बहुतांशी चार भिंतींच्या बंदिस्त चौकटीत झालं आहे. त्यामध्ये कुठेतरी भावनिक गोष्टींचा अभाव पहायला मिळतो. प्राचीन काळी बघितलं तर छत्रपती शिवरायांचे दादोजी कोंडदेव, संत ज्ञानेश्वरांचे निवृत्तीनाथ, स्वामी विवेकानंदांचे स्वामी रामकृष्ण परमहंस... अशा अनेक महान व्यक्तींच्या आयुष्याला कलाटणी देणारे हे त्यांचे गुरु. खरेतर शिष्यांच्या कर्तृत्वावर गुरुंची कारकीर्द अवलंबून असते हे खरंच कारण रमाकांत आचरेकरांना सचिन तेंडुलकरांसारखा शिष्य मिळाला नसता तर रमाकांत आचरेकरांना त्यांची कारकीर्द चोखाळता आली नसती.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गुरुशिष्याच्या नात्यामध्ये बंधन कधीच नसतं. ना विचारांचं बंधन... ना वयाचे पाश.... हे खरं ! एका गुरुला शिष्याकडून त्याच्या कर्तृत्वाची झालर आणि अखंड शिष्याची असणारी गुरुबद्दल प्रेमाची जोड अपेक्षित असते. सर्व धर्मग्रंथांचे सार काढलं तर असं लक्षात येतं. जर खरोखर, "गुरुशिष्यांमध्ये निःस्वार्थपणे, प्रामाणिकपणे, ज्ञानाची देवाणघेवाण होत असेल तर त्या गुरुंचे आणि त्या शिष्याचे आयुष्य सार्थक होण्यासाठी कोणीही रोखू शकत नाही...!"

भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्वीची गुरुकुल पद्धत खूप छान आणि आदर्श होती. मुलांना ॠषीमुनींकडे अरण्यात पाठवत. मग ते गुरु त्यांना स्वावलंबनापासून तर सर्व प्रकारच्या कलागुणांमध्ये पारंगत करीत असंत. त्यांच्यावर आध्यात्मिक संस्कार करीत असंत. स्वतःच्या आचरणाने त्यांच्यात चांगले गुण परोपकार, भावना इत्यादी गुण रुजवत असत. पालक देखील त्या गुरुंच्या ताब्यात आश्रमात सोडून निघून जात आणि त्या शिष्याला शिक्षा करण्याची मुभा गुरुला असे.

आदर्श आणि योग्य गुरु कसे असावेत याचे एक उदाहरण देते.

संत रामदास स्वामींकडे एक महिला तिच्या एक पाचसात वर्षांच्या मुलास घेऊन गेली. ती स्वामींना म्हणाली, "महाराज, हा मुलगा खूप गूळ खातो. याच्यावर काही उपाय करा". स्वामी रामदासांनी तिला आठदहा दिवसांनी यायला सांगितले. पुन्हा आली त्यावेळी स्वामींनी त्या मुलाच्या डोक्यावर हात ठेवला आणि त्याला गूळ न खाण्याविषयी उपदेश केला. त्या महिलेने आश्चर्याने विचारले, "महाराज, हे तुम्ही गेल्या वेळी मी आले होते तेव्हा का नाही केलंत". तेव्हा संत रामदास म्हणाले, "माते, मी स्वतःच गूळ खात होतो. मग मी याला गूळ ना खाण्याविषयी कसे सांगू शकणार होतो? आता मी गूळ खाणे सोडले आहे. म्हणून मला त्याबद्दल उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त झाला. तर असे होते पूर्वीचे गुरू म्हणून जीवनात योग्य गुरु आपणांस लाभले तर योग्य संस्कार होऊन आपण आदर्श जीवन जगू शकतो.

आयुष्य जगत असताना अनेक संकटे, अनेक चढउतार आणि अनेक खाचखळग्यांतून जावे लागते. खूप चांगलेवाईट प्रसंग येतात आणि या सर्वच संकटात आपल्याला साथ देणाऱ्या एका वाटाड्याची गरज असते. जसं की श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेश केले. जीवनातील असा वाटाड्या म्हणजेच आपला गुरुच असतो. अशा लहानसान आणि थोरामोठ्यांचे मार्गदर्शन आपल्यासाठी गुरुमोलच असते.

निसर्गाच्या सान्निध्यात अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या आपल्याला काहीना काहीतरी खूप शिकवून जातात. लहान मुंगी जरी घेतली. तरी त्या मुंगीची चिकाटी, धडपड आणि अन्न गोळा करण्यासाठीची तिची अपार धडपड, परिश्रम आपल्याला खूप काही शिकवून जाते. झाडांची परिपक्वता आणि मनाचा मोठेपणा, जमिनीचा रंग, पावसाच्या पाण्याचा अविरत अखंडपणा हिरवागार निसर्गाचा शालू परिधान केलेल्या अनेक गोष्टी आपल्याला जीवन कसं स्वच्छंदीपणे आणि निस्वार्थीपणे जगायचं हे शिकवतात. आणि हेच आपले निसर्ग गुरु बनतात.

खरेतरं, गुरु बनायला वयाचं बंधन नसतं.... ना विचार करण्याचे पाश...! तो गुरु मग लहान मुलापासून ते वृद्धांपर्यंत

असेल. फक्त गरज असते ती म्हणजे आपल्याला प्रत्येक व्यक्तीमधील त्या गुणाची जाणीव होणं गरजेचं असतं आणि मग सुरुवात होते ते गुरुशिष्याच्या सुंदर नात्याची.

गुरुशिष्यांच्या नात्यामध्ये कधीच दुजाभाव, भेदभाव, स्वार्थीपणा, मोह अशा विकृती नसतात. त्यांच्यामध्ये असते ते एकमेकांबद्दलचं प्रेम. माया, आपुलकी, शिकवण्याची तळमळ, अपेक्षांची धडपड, आदरयुक्त भीती आणि बरंच काही..! मग अशा या नात्यामध्ये गुरुशिष्य दोघंही एका अत्युच्च यशस्वी शिखरावर जाऊन ज्ञानदान आणि ज्ञानार्जनाची देवाण-घेवाण करू लागतात. आणि मग आयुष्याचं सार्थक होण्यास कोणताच वेळ लागत नाही.

गुरुविना कोण दाखविल वाट, ही पंक्ती खरोखरंच सार्थ ठरते. प्रत्येकालाच आयुष्यामध्ये गुरुशिवाय पर्याय नाही. तो गुरु कोणत्याही रुपात असेल.... त्यामध्ये माणूस, निसर्ग, झाडं, मुंगी, जनावरं, कीटक, पक्षी यांच्यारुपात आढळून येईल. प्रसंगी एखादा अनुभव हा सुद्धा आपला खूप मोठा गुरु आहे.

पण अलीकडच्या पिढीमध्ये गुरुविषयीचं प्रेम, करुणा कुठेतरी कमी होत चाललिये...! आता इंटरनेट, मोबाईल, संगणक किंवा आयपॅडला आत्ताची पिढी खूप महत्त्व देते. पण त्यातसुद्धा काही गैर नाही पण एखाद्या मनुष्यरुपी गुरुला केंद्रस्थानी मानून आयुष्यात केलेली वाटचाल ही त्यापेक्षा सर्वस्वी ठरेल यात काही शंका नाही......!

# शेतकरी बाप माझा

शेतकरी,
बाप माझा...
म्हणे जग,
त्याला राजा...
    तो पोशिंदा, का रे देवा,
    या जगाचा... दुःख सारे
    भुकेलेल्या, त्याच्या माथी
    लेकरांचा... द्यावे कारे...
पिकवतो, रडू रडू,
रानं सारं... डोळे ओले
निसर्गाने, पावसान
दिला मारं, त्याने केले...
    पीक गेलं, तुझ्या पुढे,
    वाया सारं, झुकला तो
    उपाशी रे, जीवनास
    त्याचं घरं... एकला तो...

**- कु. स्मिता वसंत पाटील**
बी. एड्. २



# शेतकरी माझा

जन्मतो तो पृथ्वीवर अन्नदाता म्हणूनी
त्या अन्नाच्या कणांसाठी मात्र तोच झटतो
घेऊन डोक्यावर कर्ज, त्याला कष्ट पेलावे लागते.
ऊन, वारा, पाऊस, पाणी त्याचे त्याला भान नसते
पिकाच्या प्रत्येक कणाला त्याला छातीस लावावे लागते
येवढे करूनही त्याचा नशीबी काय येते??
येते ती फक्त आत्महत्या...
का तो शेतकरी आजही पारतंत्र्यात अडकलाय?
का तो शेतकरी अन्नदाता बनलाय?
का त्याच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेतलाय?
का सगळ्यांचे पुण्य घेणारा आज अपराधी बनलाय?
का देता तू असा छळ करतोस, परिश्रम जो करतो
त्याला मजबूर तू करतोस ?
हाच तुझा न्याय असेल तरी तो शेतकरी तरी काय करेल
म तुध्या या चिमुरड्यांचं पोट कोण भरेल ?

**- कु. स्मिता वसंत पाटील**
बी. एड्. २



# आजची महागाई

**पाटील स्मिता वसंतराव**, बी. एड. भाग २

आज सगळ्याच वस्तूंच्या किंमती अगदी गगनाला भिडलेल्या आहेत. एखाद्या वस्तूची किंमत वाढली की ती कमी होण्याचे नावच नाही. बाजारातील अन्नधान्य, भाजीपाला, फळफळावळ वगैरे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत दिवसेंदिवस भरमसाठ वाढ होत आहे. त्यामुळे सर्वच स्तरातील लोकांची आर्थिक कुचंबणा झाली आहे. वाढत्या महागाईमुळे सर्वच अस्वस्थ झाले आहेत.

घरातील आजी तिच्या तरुणपणातील स्वस्ताईचे वर्णन करताना सांगते, "आमच्या काळात नारळ दोन रुपयाने मिळत होता. शंभर-दोनशे रुपयांत महिन्याचा खर्च निघून पन्नास शंभर रुपये शिल्लक राहत. आजीच्या या सर्व गोष्टी आज चमत्कारिक कथाच वाटतात.

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. पण वाढत्या किंमतीमुळे या मूलभूत गरजांची पूर्तता होणे दिवसेंदिवस कठीण झाले आहे. वर्तमानपत्रात कुपोषणाच्या बातम्या येतात. गरिबीमुळे स्वतःचे व कुटुंबाचे दोन वेळचे पोटसुद्धा भरू न शकल्याने आत्महत्या करणाऱ्या पतीपत्नींच्या कहाण्या वाचताना मन गलबलून जाते. आज समाजात होणाऱ्या चोऱ्यामाऱ्या, लाचलुचपत, भ्रष्टाचार यांसारखे सामाजिक गुन्हे हे आत्यंतिक दारिद्र्यामुळे घडत आहेत. लोकसंख्या वाढते आहे. त्या प्रमाणात रोजगार धंदा न वाढल्याने बेकारीचे प्रमाण एकसारखे वाढते आहे. महागाई रोखण्यासाठी सरकारला धारेवर धरले जाते. वेगवेगळे मोर्चे काढत ह्या वाढत्या महागाईला विरोध करण्याचे प्रयत्नही चालूच आहेत. जीवनोपयोगी वस्तूंच्या गगनाला भिडणाऱ्या किमती वाजवी व स्थिर ठेवण्यासाठी वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या नेतृत्वाखाली आंदोलने केली जात असली, तरी त्याचा अपेक्षित परिणाम दुर्दैवाने दिसतच नाही.

सतत वाढणारी लोकसंख्या हेच महागाई वाढण्याचे मूळ कारण आहे. उत्पादित वस्तूंचे उत्पादन जरी वाढले, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादन कमीच ठरते व मागणी तर वाढतच जाते. त्यामुळे मागणी जास्त पुरवठा कमी अशी स्थिती असल्यास शास्त्राच्या नियमानुसार, वस्तू मालाच्या किंमती वाढून महागाई वाढते. बरेचदा वस्तूंच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात मधल्या दलाल वर्गामुळे सुद्धा किंमती वाढतात.

बऱ्याचदा बाजारात मुद्दाम वस्तूला भाव जास्त मिळावा म्हणून कृत्रिम स्वरूपाची टंचाई निर्माण करून वस्तूंचे भाव वाढवत जातात. मग अशा वेळी फक्त लोकसंख्या नियंत्रणात ठवेली तर महागाई कमी होईल असे नाही तर लोकांची कृतीक्षमता वाढली पाहिजे. त्यांचे दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. म्हणजे लोकांना नोकरी, व्यवसाय, उद्योगधंदे उपलब्ध होतील असा विकास आराखडा केला पाहिजे. जेणेकरून लोकांकडे पैसा उपलब्ध असेल, विविध क्षेत्रातील उत्पादन वाढून अधिकाधिक नोकरी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. उत्पादनाचा वेग वाढेल. लोकसंख्येच्या मागणीएवढा पुरवठा प्राप्त होत गेल्यास महागाईची टांगती तलवार न राहता अर्थव्यवस्थाही मजबूत होईल.

खेडोपाडी, शहरात योग्यप्रकारे उद्योग निर्मिती होऊन उत्पादन क्षमता वाढल्यास मागणी पुरवठ्याचे अर्थशास्त्रीय गणित स्थिर राहून महागाईला नक्कीच आळा बसेल.






# चीनची भारत विरोधी भूमिका

**पोरे पूनम विनायक,** बी. एड. भाग २

आपला देश भारत हा बहुसांस्कृतिक, बहुभाषिक आणि विविधतेने नटलेला देश आहे. हा देश शांतताप्रिय असून अनेक देशांबरोबर त्याचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. भारतीय संविधानाने नागरिकांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, राजनैतिक न्याय, बहाल केले आहे. भारत हा एक लोकशाही देश आहे. भारत हा देश महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे. भारताने वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती केली आहे. भारताने अंतराळात मोठी झेप घेतलेली आपल्याला दिसून येते. चंद्रावर पाणी शोधणारा भारत हा पहिला देश आहे. भारताचे भविष्य खूप उज्ज्वल आहे. भारत विविध क्षेत्रात प्रगती करत आहे.

चीन हा देश भारताचा विरोधक देश आहे. चीन हा देश विस्तारवादी विचाराचा देश आहे. हा देश श्रीमंत आहे. जागतिक बाजारपेठेवर चीनचा दबदबा आहे. जगामध्ये चीनवस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. चीनची अर्थव्यवस्था खूप मोठी आहे. हा देश विस्ताराने मोठा आहे. चीन हा देश विस्तारवादाला जास्त प्राधान्य देतो. भारत, अमेरिका, ब्रिटन, जपान... इ. देश त्याचे दुश्मन आहेत. चीन हा देश जागतिक शांतता बिघडवण्याचे काम करतो. आतंकवादी देशांशी त्यांचे चांगले संबंध आहेत. हा देश लोकतांत्रिक देश नाही.

भारत चीन सीमावाद १९६२ पासून सुरू झाला. १९६२ च्या युद्धात भारताला हार पत्करावी लागली. भारताचा ४३ हजार चौ.किमी. चा प्रदेश चीनच्या ताब्यात आहे. कैलास पर्वत, मानस सरोवरचा भाग चीनच्या ताब्यात गेला. तत्कालीन प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनी चीनवर आंधळा विश्वास ठेवला. हिंदी चिनी भाई भाई असे नारे त्यांनी दिले. ते चीनला मित्र देश मानत होते. त्यांच्या राजनैतिक चुकीच्या निर्णयामुळे भारताला मोठा धक्का बसला. भारताचे अनेक सैनिक मारले गेले. त्याकाळी भारतीय सैन्याकडे पुरेसा शस्त्रसाठा नव्हता. नेहरुंनी सैन्याला कमी बजेट दिले होते. नेहरुंना वाटत होते भारताचे कोणीच दुश्मन नाहीत. भारतावर कोणी हमला करणार नाही. परंतु चीनने भारताच्या पाठीत खंजिर खुपसला.

चीन या देशामुळे कोरोना (Covid-19) हा व्हायरस संपूर्ण जगात पसरला. चीन या देशाने जगावर जैविक हल्ला केलेला आहे. आधी युद्धामध्ये शस्त्रसाठा, मिसाईल्स, अणु बॉम्बचा वापर केला जात होता. परंतु जैविक हमले करतात. यामुळे बाहेरून हमले न करता घरात घुसून हमले होतात. यामध्ये भरपूर जिवित हानी झाली आहे. जगातील १ कोटी लोकांना या व्हायरसने ग्रासले आहे. यामुळे संपूर्ण जग बंद पडले आहे. लोकांना घराबाहेर पडणं मुश्कील झालं आहे. चीन हा देश मानवतेच्या जीवावर उठला आहे. अनेक डॉक्टर्स, कर्मचारी, सफाई कर्मचारी, पोलीस इ. आपल्या जीवाची पर्वा न करता लोकांची काळजी घेत आहेत. त्यांचे आभार मानावे तितके कमी आहेत.

covid-19 या महामारीमुळे भारताचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले. अनेकांना या व्हायरसमुळे जीव गमवावा लागला. भारतात कलम १४४ लागू झाले. संचारबंदी झाली. भारताला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. या महामारीला सामोरे जात असताना चीनचे सैन्य १५ जून २०२० पासून भारतीय जागेमध्ये घुसपेठ करू लागले. १५ जून पासून भारतीय चीनी सैनिकांमध्ये वाद चालू झाला. १५ जून च्या रात्री नंतर LAC (Lie of Actual Control) वर स्थिती चिंताजनक झाली. चीनी सैनिकांनी हिंसक पद्धतीने २० भारतीय सैनिकांना मारले. तसेच भारतीय सैनिकांनीही ४० पेक्षा जास्त चीनी सैनिकांना मारले. गलवान घाटीमध्ये स्थिती चिंताजनक झाली आहे. आपले २० जवान शहीद झाले. त्यांचे हिमाचल एवढे उंच शौर्य पाहून भारताची मान उंच झाली. ही बातमी ऐकून मलाही २० जवान शहीद झाल्याचे खूप दुःख झालं. हा भारत १९६२ चा भारत नाही. हा भारत २०२० चा आहे. आज भारत सरकारने सैन्य ताकद वाढविण्यासाठी खूप मोठी गुंतवणूक केली आहे. सैन्याला निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. आज भारताची तिन्ही सैन्य दल खूप मजबूत आहेत. आजचा भारत युद्धाला घाबरत नाही.

